**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१३**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :- १२/१२/२०१२

प्रति,
मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची **सभा क्र. १३ सोमवार दि.१७/१२/२०१२ रोजी दुपारी १.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये.

**सोमवार दिनांक- १७/१२/२०१२ ची विषय पत्रिका.**

| विषय क्र. | विषय सुची |
|---|---|
| ६३ | मा.स्थायी समिती विशेष सभा क्रमांक १० बुधवार दि.७/११/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे. |
| ६४ | अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षाकरिता लागणारी खडी , डांबर मिश्रीत हॅाटमिक्स माल, सिमेंट, राळा, चाळलेली वाळू, पोयटा माती, शहाबाद फरशी, हार्ड मुरूम, सॅाफ्ट मुरूम, तांबडया वीटा, लालमाती, लोंखडी सळया, लोखंडी अँगल, वेल्डींग मेश जाळी, प्रिकास्ट आर.सी.सी. स्लॅब, सिमेंटचे मेनहोल कव्हर्स, सिमेंट मोझॅक बेंचेस पाठीसह , एन.पी.२ क्लास हयुम पाईप कॅालरसह इत्यादी साहित्य खरेदी कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दरास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ६५ | अहमदनगर महानगरपालिकेस सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षाकरिता लागणारे इलेक्टीक साहित्य उदा. ४० वॅट टयुब , स्टार्टर, लॅाक होल्डर, चोक, टयुब पट्टी, १५० वॅट सोडीयम बल्ब, सोडीयम चोक, इग्नेटर, कॅापर केबल, वायर, फॅन, मोटर पंप, मेनस्वीच स्टार्टर, फ्युज , यु.पी.एस. टयुबलर बॅटरी खरेदी कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दरास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ६६ | अहमदनगर महानगरपालिकेच्या एकूण ७८ वाहनांवर सन २०१२-२०१३ या सालाकरीता विमा उतरविणे कामी झालेला खर्च सन २०१२-२०१३ चे अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा रू.३,५०,१७५/- जादा झालेला असल्याने सदर विमा रकमेचे समायोजन वाहन इन्शुरन्स लेखाशिर्षाखाली रूपये ६,००,०००/- व उर्वरीत रूपये ३,५०,१७५/- रकमेचे समायोजन नविन वाहन खरेदी या लेखा शिर्षकाखाली करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ६७ | श्री. शांताराम सोन्याबापु गहिले अ.नगर यांना व्यवसायासाठी अमरधाम गेट जवळील १०X१० चौ. फुट या मोजमापाची जागा भाडेतत्वावर १ वर्षासाठी दरमहा भाडे रू.४००/- अनामत रक्कम रू.२०,०००/- घेणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |

| | |
|---|---|
| ६८ | अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्नीशियन या पदावर अटी व शर्ती सौ. मोरे पल्लवी दगडू यांची केलेल्या करारबध्द मानधनावरील वरील नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ६९ | अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी तथा संक्रमण अधिकारी या पदांवर अटी व शर्ती नुसार डॉ. रूपाली आनंद कुलकर्णी यांची केलेल्या करारबध्द मानधनावरील नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ७० | अहमदनगर महानगरपालिका हद्दीत सन २०१२-२०१३ या वर्षाकरिता पारगमन शुल्क वसुलीकरिता अभिकर्ता नेमणूक प्रक्रिया बाबत अहमदनगर महानगरपालिकेचे मा.मुंबई उच्च न्यायालयाचे, औरंगाबाद खंडपीठ येथील विधी सल्लागार यांच्या अभिप्रायासह प्रशासकीय प्रस्ताव निर्णयार्थ. |

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत-** १] विषय क्र. ६३ - मा.स्थायी समिती विशेष सभा क्रमांक- १० बुधवार दिनांक ७/११/२०१२ रोजीच्या इतिवृत्ताची प्रत

२] विषय क्रमांक- ६४ ते ७० च्या प्रस्तावाच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- १३**

विषय क्रमांक- ६३ सोमवार दिनांक १७/१२/२०१२

ठराव क्रमांक- ६३ सोमवार दिनांक १७/१२/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** मा. स्थायी समिती विशेष सभा क्रमांक १० बुधवार दिनांक ७/११/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकूर :-** मा. स्थायी समिती विशेष सभा क्रमांक १० बुधवार दिनांक ७/११/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा.स्थायी समिती सभे पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा. सभापती साहेब :- मागील सभा दि. ७/११/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे आहे.

जकात अधिक्षक श्री. साबळे :- कार्यवृत्त कायम करतांना ठराव क्रमांक ५१ दि.७/११/२०१२ मधील जागा भाडे तत्वावर घेणेबाबतच्या विषयामध्ये दुरूस्ती करावी लागेल.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- मागील सभेमध्ये आपण मंजुरी दिलेली आहे.

जकात अधिक्षक श्री. साबळे :- पारगमन शुल्क वसुलीकामी ग्रामपंचयात हद्दीमध्ये तातडीच्या प्रसंगी भाडेतत्वावर जागा घेण्यात आलेला होती. मागील ठरावात त्यामध्ये १ महिन्याकरीता मुदत टाकलेली आहे. परंतु जागा भाडयाने घेवूनच तीन महिने झालेले आहे. त्यामुळे निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यत अशी दुरूस्ती करावी लागेल.

मा.सौ. खरमाळे सं.र. :- जाहिर निविदा अजून मागवल्या नाही का ?

उपायुक्त(सा.)डॉ.डोईफोडे साहेब:-१महिना मुदत ठरावात टाकल्यामुळे जाहिरात प्रसिध्द करता आलेली नाही त्यांचे जागाभाडे व करारनामा अजुन पर्यत केलेला नाही. त्यांना जागाभाडे देणे आवश्यक आहे.९व्या महिन्यामध्ये नाक्यात घेतल्यानंतर २महिने झाल्यानंतर अॅग्रीमेंट केले नाही.

मा.श्री. डागवाले कि.आ. व मा.सौ. खरमाळे सं.र. :- सहा महिन्याच्या मुदतीपर्यत वाढ देण्यांत यावी.

जकात अधिक्षक श्री. साबळे :- सहा महिने देण्या पेक्षा निविदा प्रक्रिया पुर्ण पर्यत मंजुरी दयावी.

मा.सौ. खरमाळे सं.र. :- निर्णय होत नाही तोपर्यत दुसरा माणूस कसा येणार ?

उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे साहेब :- मागचे तीन महिने धरून ६ महिन्याच अॅग्रीमेंट करणे.

मा.श्री. कवडे उ.खं. :- मागील ठराव क्र.५१ दि.७/११/२०१२ सभेत मनपा पारगमन नाक्याकरिता सोलापुर रोड, जामखेड रोड व पाथर्डी रोड येथील संबंधीत ग्रामपंचायत हद्दीमधील खाजगी खुल्या जागाचे शिघ्रगणकाच्या प्रचलीत बाजार भावानुसार येणारे दरमहा भाडे रक्कमेत १५ टक्के वाढ करून एक महिन्याकरिता मंजुरी दिलेली होती. परंतु दरमहा भाडे रकमेत १५ टक्के करून सहा महिनेकरिता दुरूस्ती करून इतिवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सौ. गायकवाड नि.व. :- मागील विषय क्र.५१ दि.७/११/२०१२ सभेत मनपा पारगमन नाक्याकरिता सोलापुर रोड, जामखेड रोड व पाथर्डी रोड येथील ग्रामपंचायत हद्दीमधील खाजगी खुल्या जागाचे शिघ्रगणकाच्या प्रचलीत बाजार भावानुसार येणारे दरमहा भाडे रक्कमेत १५ टक्के वाढ करून एक महिन्याकरिता मंजुरी दिलेली होती. परंतु दरमहा भाडे रकमेत १५ टक्के वाढ करून सहा महिनेकरिता दुरूस्ती करावी व दुरूस्तीसह इतिवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- मा. स्थायी समिती विशेष सभा क्रमांक १० बुधवार दिनांक ७/११/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करतांना विषय क्र.५१ दि.७/११/२०१२ सभेत मनपा पारगमन नाक्याकरिता सोलापुर रोड, जामखेड रोड व पाथर्डी रोड येथील ग्रामपंचायत हद्दीमधील खाजगी खुल्या जागाचे शिघ्रगणकाच्या प्रचलीत बाजार भावानुसार येणारे दरमहा भाडे रक्कमेत १५ टक्के वाढ करून एक महिन्याकरिता मंजुरी दिलेली होती. परंतु दरमहा भाडे रकमेत १५ टक्के वाढ करून सहा महिनेकरिता दुरूस्ती करावी व दुरूस्तीसह दिनांक ७/११/२०१२ रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव:-**मा.स्थायी समिती विशेष सभा क्रमांक १०बुधवार दिनांक ७/११/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करतांना विषय क्र.५१ दि.७/११/२०१२ सभेत मनपा पारगमन नाक्याकरिता सोलापुर रोड, जामखेड रोड व पाथर्डी रोड येथील ग्रामपंचायत हद्दीमधील खाजगी खुल्या जागाचे शिघ्रगणकाच्या प्रचलीत बाजार भावानुसार येणारे दरमहा भाडे रक्कमेत १५ टक्के वाढ करून एक महिन्याकरिता मंजुरी दिलेली होती. **त्याऐवजी** अहमदनगर महानगरपालिकेचे पारगमन नाक्याकरिता सोलापुर रोड, जामखेड रोड व पाथर्डी रोड येथील संबंधीत ग्रामपंचायत हद्दीमधील खाजगी खुल्या जागाचे शिघ्रगणकाच्या प्रचलीत बाजार भावानुसार येणारे दरमहा भाडे रकमेत १५% (पंधरा टक्के)वाढ करून ६(सहा)महिनेकरिता सदरच्या खुल्या जागा भाडे तत्वावर घेणेस मंजूरी देण्यांत येत आहे. तसेच सदरचे पारगमन जकात नाक्याकरिता नवीन जागा भाडयाने घेणेकामी जाहिर निविदा मागविण्यांत याव्यात. या दुरूस्तीसह मा.स्थायी समिती विशेष सभा क्र.१० बुधवार दि.७/११/२०१२ रोजी सभेचे इतिवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. कवडे उमेश खंडेराव. सही /-

अनुमोदक :- मा.सौ. गायकवाड निलीमा वसंत सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- १३**

विषय क्रमांक- ६४ सोमवार दिनांक १७/१२/२०१२

ठराव क्रमांक- ६४ सोमवार दिनांक १७/१२/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षाकरिता लागणारी खडी , डांबर मिश्रीत हॉटमिक्स माल, सिमेंट, राळा, चाळलेली वाळू, पोयटा माती, शहाबाद फरशी, हार्ड मुरूम, सॉफ्ट मुरूम, तांबडया वीटा, लालमाती, लोंखडी सळया, लोखंडी अँगल, वेल्डींग मेश जाळी, प्रिकास्ट आर.सी.सी. स्लॅब, सिमेंटचे मेनहोल कव्हर्स, सिमेंट मोझॅक बेंचेस पाठीसह , एन.पी.२ क्लास हयुम पाईप कॉलरसह इत्यादी साहित्य खरेदी कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दरास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** :- अ.नगर मनपा स्टोअर विभाग दि.३/११/२०१२

विषय- सन २०१२-१३या आर्थिक वर्षाकरिता अहमदनगर महानगरपालिकेस खडी,डांबर मिश्रीत हॉटमिक्स माल, सिमेंट,राळा,चाळलेली वाळू,पोयटा माती,शहाबाद फरशी,हार्ड मुरुम, सॉफ्ट मुरुम, तांबडया वीटा,लालमाती,लोखंडी सळया,लोखंडी अँगल, वेल्डींग मेश जाळी,प्रिकास्ट आर.सी.सी.स्लॅब,सिमेंटचे मेनहोल कव्हर्स,सिमेंट मोझॅक बेंचेस पाठीसह,एन.पी.२ क्लास RCC पाईप कॉलरसह इ.साहीत्य पूरवठा वार्षिक निविदा दर मंजुरीबाबत.

सादर,

विनंती रिपोर्ट की,सन२०१२-१३या आर्थिक वर्षाकरिता अहमदनगर महानगरपालिकेस खडी,डांबर मिश्रीत हॉटमिक्स माल,सिमेंट,राळा,चाळलेली वाळू,पोयटा माती,शहाबाद फरशी,हार्ड मुरुम,सॉफ्ट मुरुम,तांबडया वीटा,लालमाती,लोखंडी सळया,लोखंडी अँगल,वेल्डींग मेशजाळी, प्रिकास्ट आर.सी.सी.स्लॅब,सिमेंटचे मेनहोल कव्हर्स,सिमेंट मोझॅक बेंचेसपाठीसह,एन.पी.२क्लास RCCपाईप कॉलरसह इ.साहीत्य पूरवठा पुरवण्यासाठी मा.महाराष्ट्र शासननिर्णय क्रमांकःमातसं/नस्ती२०१०/ प्र.क्र.३४/३९सामान्यप्रशासन विभाग मंत्रालय मुंबई-४०००३२दि.६ऑगस्ट२०१०अन्वये ई-निविदा कार्य प्रणालीचा अवलंब करुन जाहिर टेंडर नोटीस प्रसिध्द करुन वार्षिक निविदा मागविल्या असता मुदतीत-

१)मे.साई प्रॉडक्टस्,कोपरगाव

२)मे.साई सेल्स कॉर्पोरेशन,संगमनेर

३)मे.तृष्णा सेल्स कॉर्पोरेशन,अहमदनगर

याप्रमाणे तीन निविदा प्राप्त झालेल्या असून सदर निविदांचे व्यापारी (दराचे)लिफाफे उघडण्यात येवून निविदा दराचा तुलनात्मक तक्ता पाहता स्पर्धात्मकदृष्टया कमीचे निविदाकार मे.तृष्णा सेल्स कॉर्पोरेशन,अहमदनगर यांना निविदा दर वाटाघाटीसाठी मा.उपायुक्तसाहेब(कर) यांचे आदेशान्वये जा.क्र.स्टोअर विभाग-६८ दि.१२/०७/२०१२ अन्वये समक्ष उपस्थित राहणेबाबत कळविले असता ते समक्ष उपस्थित राहिले असून मा.प्रशासकिय निविदा छाननी समितीतील मा.उपायुक्तसाहेब(सा.)तथा सभापती,स्टोअर विभाग प्रमुख व शहर अभियंता हे उपस्थित होते व उर्वरित मा.प्रशासकिय निविदा छाननी समिती सदस्य अनुपस्थित राहिल्याने सदरची बैठक रद्द करण्यात आलेली आहे.

सदर निविदातील स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम निविदा दराने पुरवठादार मे.तृष्णा सेल्स कॉर्पोरेशन,अहमदनगर हे बैठकिस उपस्थित राहील्याने त्यांनी त्यांचे निविदा दरात दर कमी करुन अंतिम दर लेखी पत्रान्वये दिलेले असून सदरचे दर निविदा दराच्या तुलनात्मक तक्त्यात कॉलम क्रं.११ मध्ये नमुद केलेले आहेत.निविदाकाराचे अंतिम निविदा दराचे लेखी पत्र मा.प्रशासकिय निविदा छाननी समिती दि. ३१/०७/२०१२ चे बैठकीमध्ये अवलोकनार्थ ठेवले असता बैठकित झालेल्या चर्चेनुसार शहर अभियंता यांना पुरवठादाराकडून लेखी पत्रान्वये अ.क्र.१ ते ४८ प्रकारच्या मालाचे प्राप्त झालेले तुलनात्मक तक्त्यामध्ये कॉलम क्र.११ मध्ये नमुद दर विचारात घेवुन मान्य करणे योग्य दराची शिफारस करणेबाबत सुचित केले असता त्यांनी निविदादराच्या तुलनात्मक तक्त्यातील कॉलम नं.१२ मध्ये नमुद केलेल्या दरानुसार दर मंजुरीबाबत शिफारस केलेली आहे.

निविदाकार यांनी निविदादरात कमी करुन दिलेले बहुतांश मालाचे दर व शहर अभियंता यांनी शिफारस केलेले दरात थोडयाफार प्रमाणात तफावत असल्याने निविदाकार मे.तृष्णा सेल्स कॉर्पोरेशन,अहमदनगर यांनी शिफारस केलेल्या दरात मालाचा पुरवठा करणार किंवा कसे ? याबाबत लेखी विचारणा करुन घेवून शहर अभियंता यांचे शिफारसी प्रमाणे ज्या मालाचे दर निविदाकार मान्य करणार आहेत ते दर मंजुर करण्यास व उर्वरीत मालाचे दर नामंजुर करुन फेर निविदा मागविणे बाबत शिफारस समिती मार्फत करण्याचे ठरले आहे.

समितीत झालेल्या निर्णयाप्रमाणे जा.क्र.स्टोअर विभाग-१२४दि.०५/०९/२०१२ अन्वये मे.तृष्णा सेल्स कॉर्पोरेशन, अहमदनगर यांना दिलेल्या पत्रामध्ये मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेले दर नमुद करुन सदर दराने साहित्याचा पुरवठा करणार किंवा कसे याबाबत लेखी संमतीपत्र देण्यात यावे.असे कळविले असता त्यांनी शहर अभियंता यांनी शिफारस केलेल्या दराने अ.क्र.१ ते ८ व अ.क्र.११ते ४८चे साहित्य पूरवठा करण्यास व अ.क्र.९ सिमेंट ISI मार्क प्रति ५० किलो गोणी ग्रेड ४३ रक्कम रु.३४०=००प्रती १ गोणी व अ.क्र.१० सिमेंट ISI मार्क प्रति ५० किलो गोणी ग्रेड ५३ रक्कम रु.३४०=००प्रती १गोणी या दराने पुरवठा करण्यास तयार असलेबाबत आपले दि.१०/०९/२०१२ रोजीचे लेखी संमतीपत्र दिलेले आहे.

तरी मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेल्या दराने अ.क्र.१ ते ८ व अ.क्र.११ ते ४८ चे साहित्य पूरवठा करण्यास निविदाकार मे.तृष्णा सेल्स कॉर्पोरेशन,अहमदनगर हे तयार असल्याने सदरचे(निविदा दराच्या तुलनात्मक तक्त्यात कॉलम क्र.१२ मध्ये नमुद)दर मंजुर करणेबाबत व निविदाकार अ.क्र.९ व १० चे साहित्य मा.शहर अभियंता यांचे शिफारसी प्रमाणे दरात पुरवठा करण्यास तयार नसल्याने सदरेच दर नामंजुर करुन सदरचे साहित्य जरुरीप्रमाणे बाजारातून कोटेशन दरपत्रके मागवून किंवा अल्प मुदतीची निविदामागवून खरेदी करणेस तसेच नामंजुर निविदाकार यांची निविदा बयाणा रक्कम त्यांना परत करणेस मंजुरी मिळणेबाबत सदरचा प्रस्ताव निर्णयास्तव मा.स्थायी समिती सभेपुढे ठेवण्यास मंजुरी मिळणेबाबतच्या स्टोअर विभाग दि.१४/०९/२०१२ चे प्रस्तावावर मा.आयुक्तसाहेब,मा.उपायुक्तसाहेब(कर),मा.मुख्य लेखापरिक्षक,मा.शहर अभियंता,मा.उपशहर अभियंता यांनी अभिप्रायासह स्वाक्षरी केलेली आहे.

सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेपुढे निर्णयास्तव सविनय सादर.

<u>सोबत-</u> अ.क्र.१ ते ८ व ११ ते ४८ बांधकाम साहित्याचे मंजुरीस्तव सादर केलेल्या निविदा दराची यादी

येणेप्रमाणे स्टोअर विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

**निविदाकार - मे.तृष्णा सेल्स कॉर्पोरेशन, अहमदनगर.**

| निविदेतील अ.क्र. | मालाचा तपशिल | परिमाण | निगोसिएशन नंतर दिलेले अंतिम दर |
|---|---|---|---|
| १ | हातफोड खडी साईज - १ १/२" x २" | प्रती १ ब्रास | रु.१,३१४=०० |
| २ | मशिन फोड खडी साईज - १.१/२" | प्रती १ ब्रास | रु.१,३१४=०० |
| ३ | मशिन फोड खडी साईज - १" | प्रती १ ब्रास | रु.१,२८८=०० |
| ४ | मशिन फोड खडी साईज - ३/४" | प्रती १ ब्रास | रु.१,५५१=०० |
| ५ | मशिन फोड खडी साईज - १/२" | प्रती १ ब्रास | रु.१,५१३=०० |
| ६ | मशिन फोड खडी साईज - १/४" | प्रती १ ब्रास | रु.१,३०३=०० |
| ७ | राळा १/४" | प्रती १ ब्रास | रु.९८८=०० |
| ८ | डांबर मिश्रीत हॉट-मिक्स माल पेचिंगसाठी ५.५० % Bitumen,<br>६० % १२ mm metal,४० % ६ mm metal. | प्रती १ मे.टन | रु.३,७८०=०० |
| ११ | चाळलेली वाळू कोल्हार / पैठण | प्रती १ ब्रास | रु.३,५९०=०० |
| १२ | चाळलेली वाळू लोकल | प्रती १ ब्रास | रु.१,०००=०० |
| १३ | पोयटा माती | प्रती १ ब्रास | रु.६६०=०० |
| १४ | शाहबाद फरशी साईज - २' x १ १/२' x १ १/२" जाडी | प्रती १ ब्रास | रु.३,०२५=०० |
| १५ | शाहबाद फरशी साईज - २' x १ १/२' x२ " जाडी | प्रती १ ब्रास | रु.३,२४९=०० |
| १६ | हार्ड मुरुम PWD स्पेसिफिकेशन प्रमाणे. | प्रती १ ब्रास | रु.५०८=०० |
| १७ | सॉफ्ट मुरुम PWD स्पेसिफिकेशन प्रमाणे | प्रती १ ब्रास | रु.५०८=०० |
| १८ | तांबड्या विटा साईज - ९"x ४"x २ १/२" | प्रती १००० नग | रु.४,९००=०० |
| १९ | कुंड्या मातीच्या १' व्यास x २' उंच | प्रती १ नग | रु.८८=०० |
| २० | डबर | प्रती १ ब्रास | रु.९८०=०० |
| २१ | लालमाती | प्रती १ ब्रास | रु.८८०=०० |
| २२ | लोखंडी सळया गोल<br>साईज- ६ mm / ८ mm / १० mm | प्रती १ किलो | रु.४८=०० |

| | | | |
|---|---|---|---|
| २३ | लोखंडी अँगल<br>साईज-२५ x२५ x३ mm /४०x४०x३ mm | प्रती १ किलो | रु.५३=०० |
| २४ | वेल्डींग मेश- साईज - १" x १" | प्रती चौ.मिटर | रु.४४०=०० |
| २५ | प्रिकास्ट आर. सी. सी.स्लॅब<br>साईज २'लांब x १'रुंद x ४"जाडी ,<br>स्टील ३.०० कि.ग्रॅ. | प्रती १ नग | रु.३५०=०० |
| २६ | प्रिकास्ट आर.सी. सी.स्लॅब<br>साईज-३'लांब x १'रुंद x ४"जाडी ,<br>स्टील ४.५० कि.ग्रॅ. | प्रती १ नग | रु.४५०=०० |
| २७ | प्रिकास्ट आर.सी.सी.स्लॅब<br>साईज-४'लांब x १'रुंद x ४"जाडी | प्रती १ नग | रु.६५०=०० |
| २८ | प्रिकास्ट आर. सी. सी.स्लॅब<br>साईज ५'लांब x १'रुंद x४"जाडी | प्रती १ नग | रु.७५०=०० |
| २९ | प्रिकास्ट आर. सी. सी.स्लॅब<br>हेवी क्लॉलिटी २० टन क्षमता<br>साईज - ४'लाब x १'रुंद x ५"जाडी | प्रती १ नग | रु.९५०=०० |
| ३० | प्रिकास्ट आर. सी. सी.स्लॅब<br>हेवी क्लॉलिटी २० टन क्षमता<br>साईज - ५'लाब x १'रुंद x ५"जाडी | प्रती १ नग | रु.१,५००=०० |
| ३१ | सिमेंट मेनहोल कव्हर्स हेवी डयुटी गोल साईज फ्रेम सह-<br>कव्हर- ६३०mm व्यास गोल x १०० mm जाडी फ्रेम-<br>८००mm x १५०mm जाडी x<br>५४० mm निव्वळ | प्रती १ नग | रु.१,६४०=०० |
| ३२ | सिमेंट मेनहोल कव्हर्स मेडीयम डयुटी गोल साईज फ्रेमसह<br>कव्हर-६४५ mm व्यास गोल x ८० mm जाडी<br>फ्रेम -८४०mmx१३०mm जाडी x ५४०mm निव्वळ | प्रती १ नग | रु.१,१००=०० |
| ३३ | सिमेंट मेनहोल कव्हर्स चौकोनी साईज हेवी डयुटी फ्रेमसह<br>कव्हर १०१५mm x ५१७ mm x १००mm उंची,<br>फ्रेम-११८० mm x ७३० mm जाडी १५० mm, ९००<br>mm x ४५०mm निव्वळ | प्रती १ नग | रु.२,२००=०० |
| ३४ | सिमेंट मेनहोल कव्हर्स चौकोनी साईज मिडीयम डयुटी<br>फ्रेमसह- चौकोनी साईज कव्हर-७३० mmx ७३० mm x<br>६० mm उंची,<br>फ्रेम ८२० mm x८२० mm जाडी ११५ mm,६०० mm<br>x६०० mm निव्वळ | प्रती १ नग | रु.१,१००=०० |
| ३५ | सिमेंट मोझॅक बेंच पाठीसह<br>साईज - ६०"x ३६"x ३" जाड<br>स्टॅंड - २४" x १५" x३" जाड | प्रती १ नग | रु.२,९००=०० |
| ३६ | NP२ क्लास R.C.C. पाईप कॉलरसह<br>साईज -१५०mm व्यास x लांबी २ मीटर | प्रती १ नग | रु.६३२=०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ३७ | NP २ क्लास R.C.C. पाईप कॉलरसह<br>साईज - २०० mm व्यास x लांबी २ मीटर | प्रती १ नग | रु.७९४=०० |
| ३८ | NP २ क्लास R.C.C. पाईप कॉलरसह<br>साईज - २२५ mm व्यास x लांबी २ मीटर | प्रती १ नग | रु.८९०=०० |
| ३९ | NP २ क्लास R.C.C. पाईप कॉलरसह-साईज<br>२५० mm व्यास x लांबी २ मीटर | प्रती १ नग | रु.८९६=०० |
| ४० | NP २ क्लास R.C.C. पाईप कॉलरसह<br>साईज-३०० mm व्यास x लांबी २.५ मीटर | प्रती १ नग | रु.१,३८०=०० |
| ४१ | NP २ क्लास R.C.C. पाईप कॉलरसह<br>साईज-३५० mm व्यास x लांबी २.५ मीटर | प्रती १ नग | रु.१,९३५=०० |
| ४२ | NP २ क्लास R.C.C. पाईप कॉलरसह<br>साईज-४०० mm व्यास x लांबी २.५ मीटर | प्रती १ नग | रु.२,२३५=०० |
| ४३ | NP २ क्लास R.C.C. पाईप कॉलरसह<br>साईज - ४५० mm व्यास x लांबी २.५ मीटर | प्रती १ नग | रु.२,४७२=५० |
| ४४ | NP २ क्लास R.C.C.पाईप कॉलरसह<br>साईज - ५०० mm व्यास x लांबी २.५ मीटर | प्रती १ नग | रु.३,५०५=०० |
| ४५ | NP २ क्लास R.C.C. पाईप कॉलरसह<br>साईज - ६०० mm व्यास x लांबी २.५ मीटर | प्रती १ नग | रु.३,८१५=०० |
| ४६ | NP २ क्लास R.C.C. पाईप कॉलरसह<br>साईज-७००mm व्यासxलांबी २.५ मीटर | प्रती १ नग | रु.५,६३२=५० |
| ४७ | NP २ क्लास R.C.C. पाईप कॉलरसह<br>साईज - ८०० mm व्यास x लांबी २.५ मीटर | प्रती १ नग | रु.६,७२२=५० |
| ४८ | NP २ क्लास R.C.C. पाईप कॉलरसह<br>साईज - ९०० mm व्यास x लांबी २.५ मीटर | | रु.८,१९२=५० |

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षाकरिता लागणारी खडी , डांबर मिश्रीत हॉटमिक्स माल व इतरसह इत्यादी साहित्य खरेदी कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दरास मंजूरी देणेबाबत विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- मागील वर्षी मुरूम खरेदी किती करण्यांत आली.

स्टोअर विभाग लिपिक श्री. आढाव :- सन २०११-२०१२ मध्ये एकूण खर्च ११ लाख ३३ हजार हार्डमुरूम खरेदी करण्यात आला.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- एवढ सामान कुणाकडे दिल त्याचा अहवाल दयावा. कारण कधीही सामानाची मागणी केली तरी सामान शिल्लक नाही असे उत्तर मिळते.

स्टोअर विभाग लिपिक श्री. आढाव :- शाखा अभियंत्याला त्यांच्या मागणीनुसार सामान दिले जाते.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- डेली लावल्यानंतर व्यक्तीकडे काहीच सामान नसते.

उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे साहेब :- मागणी तुमच्याकडे नसते का ?

शहर अभियंता श्री. मगर :- रजिस्ष्टर स्टोअर कडे असते.

स्टोअर विभाग लिपिक श्री. आढाव :- मागणी नोंदवून घेतलेली असते.

मा.श्री. खरमाळे सं.र. :- नगरसेवकांनी यादया दाखवा.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- कामाची पाहणी करून कशा पध्दतीचा माल वापरला गेला ते पहा.

मा.श्री. भोसले ग.पु. :- ७५ बाकडे कोणाला दिले.

मा.श्री. डागवाले कि. आ. :- स्टोअर विभागाने रजिष्टर मागवून दाखवा. बाकडे कोठे बसवले सगळे डिटेल दाखवल्या शिवाय मान्यता मिळणार नाही.

मा.सौ. गायकवाड नि.व. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. कवडे उ.खं. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षाकरिता अहमदनगर महानगरपालिकेस लागणारी खडी , डांबर मिश्रीत हॉटमिक्स माल, सिमेंट, राळा, चाळलेली वाळू, पोयटा माती, शहाबाद फरशी, हार्ड मुरूम, सॉफ्ट मुरूम, तांबडया वीटा, लालमाती, लोंखडी सळया, लोखंडी अँगल, वेल्डींग मेश जाळी, प्रिकास्ट आर.सी.सी. स्लॅब, सिमेंटचे मेनहोल कव्हर्स, सिमेंट मोझॅक बेंचेस पाठीसह , एन.पी.२ क्लास हयुम पाईप कॉलरसह इत्यादी साहित्य खरेदी करणेकामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा धारक मे. तृष्णा सेल्स कॉर्पोरेशन, अहमदनगर यांनी निगोसिएशन अंती कमी करून दिलेले अ.क्र. १ ते ८ व अ.क्र. ११ ते ४८ चे निविदा दरातील तुलनात्मक तक्त्यातील कॉलम क्र. १२ मध्ये नमुद दरास मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

तसेच नामंजुर निविदाकार यांची निविदा बयाणा रक्कम त्यांना परत करणेस मंजुरी देण्यात येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ. गायकवाड निलीमा वसंत. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. कवडे उमेश खंडेराव सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-

सभापती,

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- १३**

विषय क्रमांक- ६५ सोमवार दिनांक १७/१२/२०१२

ठराव क्रमांक- ६५ सोमवार दिनांक १७/१२/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेस सन२०१२-२०१३ या आर्थिक वर्षाकरिता लागणारे इलेक्टीक साहित्य उदा.४०वॅट टयुब,स्टार्टर,लॉक होल्डर,चोक,टयुब पट्टी,१५०वॅट सोडीयम बल्ब, सोडीयम चोक,इग्नेटर, कॉपर केबल,वायर,फॅन, मोटर पंप, मेनस्वीच स्टार्टर,फ्युज,यु.पी.एस. टयुबलर बॅटरी खरेदी कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दरास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** :- अ.नगर मनपा स्टोअर विभाग दि.९/११/२०१२

विषय- सन२०१२-१३या आर्थिक वर्षाकरिता अहमदनगर महानगरपालिकेस इलेक्ट्रीक साहित्य उदा.४०वॅट टयुब, स्टार्टर, लॉक होल्डर,चोक,टयुब,पट्टी,१५० वॅट सोडयीम बल्ब , सोडीयम चोक, इग्नेटर,कॉपरकेबल,वायर,फॅन,मोटर पंप,मेनस्वीच स्टार्टर, फ्युज, यु.पी.एस, टयुबलर बॅटरी इ.पुरवठा वार्षिक निविदा दर मंजुरीबाबत.

सादर,

विनंती रिपोर्ट की, सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाकरिता अहमदनगर महानगरपालिकेस इलेक्ट्रीक साहित्य उदा.४० वॅट टयुब, स्टार्टर,लॉक होल्डर,चोक,टयुब पट्टी, १५० वॅट सोडीयम बल्ब,सोडीयम चोक, इग्नेटर,कॉपर केबल,वायर,फॅन,मोटर पंप,मेनस्वीच स्टार्टर,फ्युज, यु.पी.एस, टयुबलर बॅटरी इ.साहीत्य पुरवण्यासाठी मा.महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक:मातसं/नस्ती २०१०/प्र.क्र.३४/३९ सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई - ४०००३२ दि.६ ऑगस्ट २०१० अन्वये ई-निविदा कार्य प्रणालीचा अवलंब करुन फेर जाहिर टेंडर नोटीस(प्रथम वेळ)प्रसिध्द करुन वार्षिक निविदा मागविल्या असता मुदतीत-

१)मे.अर्हम एंटरप्राईज,मुंबई.

२)मे.दि.न्युट्रॉन इलेक्ट्रिकल्स,मुंबई.

३)मे.जय इंम्पेक्स,मुंबई.

याप्रमाणे तीन निविदा प्राप्त झालेल्या असून सदर निविदांचे व्यापारी (दराचे)लिफाफे उघडण्यात येवून निविदा दराचा तुलनात्मक तक्ता पाहता -

**<u>बाब नं.१</u>**

अ.क्र.-१ ते ७६ चे दर मे.अर्हम एंटरप्राईज,मुंबई यांचे स्पर्धात्मकदृष्टया सर्वात कमी आहेत.

अ.क्र.-१ ते ७६ चे साहित्याचे DSR दर नमुद करणेसाठी निविदा दराचा तुलनात्मक तक्ता जा.क्र.स्टोअर विभाग-४४ दि.२९/०६/२०१२ अन्वये मा.इलेक्ट्रिक विभाग प्रमुख,अहमदनगर महानगरपालिका यांचेकडेस पाठविला असता त्यांनी निविदा दराच्या तुलनात्मक तक्त्यात कॉलम क्र.१० मध्ये उपलब्ध दरसुचीतील दर नमुद करुन सदरचा तुलनात्मक तक्ता जा.क्र.इलेक्ट्रिक विभाग-२१५ दि.०८/१०/२०१२ अन्वये स्टोअर विभागाकडे पाठविलेला आहे.

निविदा दराच्या तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता -

अ.क्र.-२,२२,५६,५९ ते ६०,६३ ते ७४ व ७६ चे DSR दर उपलब्ध नाहीत.

अ.क्र.-३ व ११ चे निविदेतील स्पर्धात्मकदृष्टया सर्वात कमीचे प्राप्त दर व DSR दर समान आहेत.

अ.क्र.- १,५,७ ते १०,१२,१४ ते १६,१८ ते २१,२३ ते २८,३०,३६ ते ३९,४२,४९,५२ ते ५३, ५७ ते ५८ चे दर DSR दरापेक्षा कमी आहेत.

अ.क्र.- ४,६,१३,१७,२९,३१ ते ३५,४० ते ४१,४३ ते ४८,५० ते ५१,५४ ते ५५,६१ ते ६२ व ७५ चे दर DSR दरापेक्षा जास्त आहेत.

बाब नं.१ मधील स्पर्धात्मकदृष्टया सर्वात कमीचे निविदा दर धारक मे.अर्हम एंटरप्राईज,मुंबई यांना मा.उपायुक्तसाहेब(सा) यांचे आदेशान्वये जा.क्र.स्टोअर विभाग-१७१ दि.२३/१०/२०१२ अन्वये दि.३०/१०/२०१२ रोजी दुपारी ४=०० वाजता समक्ष उपस्थित राहणेबाबत कळविले असता ते समक्ष उपस्थित राहिले व त्यांनी निगोसिएशन वेळी झालेल्या समक्ष चर्चेनुसार -

**१)**निविदेतील DSR पेक्षा कमी असलेले अ.क्र.१,५,७ ते १०,१२,१४ ते १६,१८ ते २१,२३ ते २८,३०,३६ ते ३९,४२,४९,५२ ते ५३,५७ ते ५८ चे विद्युत साहित्य निविदेमध्ये नमुद केलेल्या दराने.

**२)**DSR दरापेक्षा किमान १०% पर्यंत अधिक दर असणारे अ.क्र.३,११,१७,३१ ते ३२,३४ ते ३५,४०,४५,५१,५५ चे विद्युत साहित्य DSR दराप्रमाणे

**३)**DSR दरापेक्षा किमान १०% पासून कमाल मर्यादेपर्यंत अधिक दर असणारे अ.क्र.४, ६, १३, २९, ३३,४१,४३,४४,४६ ते ४८, ५०, ५४,६१ ते ६२,७५ चे विद्युत साहित्य DSR दरापेक्षा १०% अधिक दराने

**४)**DSR दर उपलब्ध नसलेले अ.क्र.२,२२,५६,५९ ते ६० चे विद्युत साहित्य सन २०११-१२ चे वार्षिक मंजुर निविदा दराने.

**५)**DSR दर व सन २०११-१२ चे वार्षिक मंजुर निविदा दर नसलेले अ.क्र.६३ ते ७४ व ७६ चे विद्युत साहित्य प्राप्त निविदेमधील स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम दरामध्ये १०% दर कमी करुन पूरवठा करण्याचे मान्य केले असून तसे लेखी संमतीपत्र दिलेले आहे सदरचे दर निविदा दराच्या तुलनात्मक तक्त्यात कॉलम नं.१२ मध्ये नमुद करण्यात आलेले असून त्याप्रमाणे दर मंजुर करणेबाबत शिफारस समितीमार्फत करण्याचे ठरले आहे.

तरी मा.प्रशासकिय निविदा छानणी समितीने केलेल्या शिफारसी प्रमाणे निविदा दराच्या तुलनात्मक तक्त्यात कॉलम नं.१२ मध्ये नमुद करण्यात आलेल्या दरास तसेच नामंजुर निविदाकार यांची निविदा बयाणा रक्कम त्यांना परत करणेस मंजुरी मिळणेबाबत स्टोअर विभाग दि.०१/११/२०१२ रोजीचे प्रस्तावावर मा.आयुक्तसाहेब,मा.उपायुक्तसाहेब(कर),मा.मुख्य लेखापरिक्षक,मा.इलेक्ट्रिक विभाग प्रमुख यांनी अभिप्रायासह स्वाक्षरी केलेली आहे.

तरी मा.प्रशासकिय निविदा छानणी समितीच्या शिफारसी प्रमाणे निविदाकार यांनी दर निगोसिएशन नंतर दिलेले (निविदा दराच्या तुलनात्मक तक्ता कॉलम क्र.१२ मध्ये नमुद ) वार्षिक निविदा दरास मंजुरी मिळावी हि विनंती.

सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेपुढे निर्णयास्तव सविनय सादर.

**<u>सोबत -</u>** वार्षिक निविदा दर मंजुरीस्तव सादर केलेल्या विदयुत साहित्याची यादी पान नं.१ ते ५
येणेप्रमाणे स्टोअर विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

**निविदाकार - मे.अर्हम एंटरप्राईज, मुंबई.**

| निविदेतील अ.क्र. | मालाचा तपशील | परिमाण | निगोसिएशन नंतर दिलेले अंतिम निविदा दर रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | ४ फुट ४० वॅट ट्युब<br>क्रॉम्प्टन / फ़िलिप्स/विप्रो | प्रती १ नग | ४४=०० |
| २ | ट्युब लॉक होल्डर (ब्रॉस कॉन्टॅक्ट)<br>क्रॉम्प्टन / फ़िलिप्स/विप्रो | प्रती १ नग | १०=८० |
| ३ | ४० वॅट ट्युब स्टार्टर<br>क्रॉम्प्टन / फ़िलिप्स/विप्रो | प्रती १ नग | ११=०० |
| ४ | ४ फुट ट्युब पट्टी चोक स्टार्टरसह कप्लींट<br>क्रॉम्प्टन / फ़िलिप्स/विप्रो | प्रती १ नग | ३१६=८० |
| ५ | १५० वॅट सोडीयम बल्ब<br>क्रॉम्प्टन / फ़िलिप्स /विप्रो | प्रती १ नग | ५४०=०० |
| ६ | १५० वॅट सोडीयम चोक<br>क्रॉम्प्टन / फ़िलिप्स/विप्रो | प्रती १ नग | ७९९=७० |
| ७ | १५०/२५० वॅट सोडीयम इग्नेटर<br>क्रॉम्प्टन / फ़िलिप्स /विप्रो/बजाज | प्रती १ नग | १८०=०० |
| ८ | १५० वॅ्ट मर्क्युरी थ्रेड टाईप होल्डर | प्रती १ नग | ८८=०० |
| ९ | सिलिंग फॅन ५६" संपूर्ण असेसरीजसह<br>उषा / ओरिएण्टल /बजाज कंपनी | प्रती १ नग | १६९०=०० |
| १० | पेडस्टल फॅन १६"<br>उषा / ओरिएण्टल /बजाज कंपनी | प्रती १ नग | २४७५=०० |
| ११ | टेबल फॅन<br>उषा /क्रॅाम्प्टन | प्रती १ नग | १८६०=०० |
| १२ | ४ फुट ४० वॅट स्ट्रीट लाईट फिंटीग<br>कप्लीट ट्युबसह<br>क्रॉम्प्टन / फ़िलिप्स /विप्रो | प्रती १ नग | ११५०=०० |
| १३ | १५० वॅ्ट सोडीयम व्हेपर कप्लीट फ़िटीग बल्बसह<br>क्रॉम्प्टन / फ़िलिप्स /विप्रो | प्रती १ नग | ३६२३=४० |
| १४ | जी.आय तार नं. १४ | प्रती १ किलो | ९०=०० |
| १५ | फ़ायबर ड्युम हंडी १२ " फ़ायबर प्लास्ट | प्रती १ नग | ५९५=०० |
| १६ | स्प्लीट टाईप एअर कंडीशनर १.५ टनक्षमता व्होल्टेज स्टॅबीलायझरसह<br>एल.जी / ब्ल्यु स्टार /पॅनासॉनिक | प्रती १ नग | ४२५००=०० |

| | | | |
|---|---|---|---|
| १७ | स्प्लीट टाईप एअर कंडीशनर २ टन क्षमता व्होल्टेज स्टॅबीलायझर एल.जी / ब्ल्यु स्टार/पॅनासॉनिक | प्रती १ नग | ५७९८२=०० |
| १८ | सी.एफ़.एल. १८ वॅट<br>क्रॉम्प्टन / फ़िलिप्स /विप्रो | प्रती १ नग | २००=०० |
| १९ | सी.एफ़.एल.११ वॅट<br>क्रॉम्प्टन / फ़िलिप्स /विप्रो | प्रती १ नग | १४४=०० |
| २० | लोखंडी ब्रॅकेट बी ग्रेड जी आय पाईप<br>साईज - ३ फ़ुट २५ MM | प्रती १ नग | २९०=०० |
| २१ | लोखंडी ब्रॅकेट बी ग्रेड जी आय पाईप<br>साईज - ५ फ़ुट ४० MM | प्रती १ नग | ४०५=०० |
| २२ | लोखडी क्लॅम्प<br>५" X ३" नटबोल्ट सह | प्रती १ नग | २५९=०० |
| २३ | २.५ एम एम २ कोअर सर्व्हिस वायर<br>३०० फ़ुट - ISI मार्क<br>नामांकित कंपनी | प्रती १ बंडल | ९३०=०० |
| २४ | १ Sq.mm पी.व्ही.सी कॉपर केबल<br>३०० फुट - ISI मार्क<br>नांमांकित कंपनी | प्रती १ बंडल | ७४०=०० |
| २५ | २.५ Sq.mm पी.व्ही.सी कॉपर केबल<br>३०० फुट - ISI मार्क<br>नांमाकित कंपनी | प्रती १ बंडल | १७२०=०० |
| २६ | ४ Sq.mm पी.व्ही.सी कॉपर केबल<br>३०० फुट - ISI मार्क<br>नांमाकिंत कंपनी | प्रती १ बंडल | २८५०=०० |
| २७ | पी.एल.३६ वॅट ट्युब<br>क्रॉम्प्टन / फ़िलिप्स /विप्रो | प्रती १ नग | १८०=०० |
| २८ | १ एच.पी.सबमर्शीबल सिंगल फ़ेज मोटर पंप<br>क्रॉम्प्टन /टेक्स्मो / लुबी /बीबीसी /किर्लोस्कर | प्रती १ नग | १४४००=०० |
| २९ | ५ एच.पी.ओपनवेल (पाणबुडी ) मोटर पंप<br>क्रॉम्प्टन /टेक्स्मो /लुबी /बीबीसी /किर्लोस्कर<br>/नामांकित कंपनी | प्रती १ नग | २२२३७=६० |
| ३० | ७.५ एच.पी.ओपनवेल (पाणबुडी ) मोटर पंप<br>क्रॉम्प्टन /टेक्स्मो / लुबी /बीबीसी /किर्लोस्कर<br>/नामांकित कंपनी | प्रती १ नग | २९६५०=०० |
| ३१ | १० एच.पी.ओपनवेल (पाणबुडी ) मोटर पंप<br>क्रॉम्प्टन / टेक्स्मो / लुबी /बीबीसी<br>/किर्लोस्कर/नामांकित कंपनी | प्रती १ नग | ३०२८२=०० |
| ३२ | ५ एच.पी. मोनोब्लॉक मोटर पंप<br>क्रॉम्प्टन / टेक्स्मो /लुबी /बीबीसी /किर्लोस्कर<br>/नामांकित कंपनी | प्रती १ नग | २२५१३=०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ३३ | ७.५ एच.पी. मोनोब्लॉक मोटर पंप<br>क्रॉम्प्टन/टेक्स्मो/लुबी /बीबीसी/किर्लोस्कर/नामांकित कंपनी | प्रती १ नग | २९८४७=४० |
| ३४ | १० एच.पी. मोनोब्लॉक मोटर पंप<br>क्रॉम्प्टन / टेक्स्मो / लुबी /बीबीसी /किर्लोस्कर/विप्रो | प्रती १ नग | ३४८१६=०० |
| ३५ | १५ एच.पी. मोनोब्लॉक मोटर पंप<br>क्रॉम्प्टन / टेक्स्मो / लुबी /बीबीसी/किर्लोस्कर/विप्रो/नामांकित कंपनी | प्रती १ नग | ४५८४१=०० |
| ३६ | ५ एच.पी. स्टार्टर<br>एल.टी एल.के/नांमाकित कंपनी | प्रती १ नग | १७३०=०० |
| ३७ | ७.५ एच.पी. स्टार्टर<br>एल.टी एल.के/नांमाकित कंपनी | प्रती १ नग | १७३०=०० |
| ३८ | १० एच.पी. स्टार्टर<br>एल.टी एल.के/ नांमाकित कंपनी | प्रती १ नग | १७३०=०० |
| ३९ | १५ एच.पी. स्टार्टर<br>एल.टी एल.के/ नांमाकित कंपनी | प्रती १ नग | ५२४०=०० |
| ४० | ४ स्क्वेअर एम.एम. x ३ कोअर कॉपर<br>सबमर्शीबल केबल ISI मार्क | प्रती १ मिटर | ९६=०० |
| ४१ | २.५ स्क्वेअर एम.एम. x ३ कोअर<br>कॉपर केबल ISI मार्क | प्रती १ मिटर | ७५=९० |
| ४२ | मेन स्वीच थ्री फ़ेज ६३ A<br>स्टेनले कंपनी /नामांकित कंपनी | प्रती १ नग | २५५०=०० |
| ४३ | १०० ॲम्पीयर ३ फ़ेज मेनस्वीच<br>स्टेनले कंपनी/नामांकित कंपनी | प्रती १ नग | ५२५३=६० |
| ४४ | २०० ॲम्पीयर ३ फ़ेज मेनस्वीच<br>स्टेनले कंपनी/नामांकित कंपनी | प्रती १ नग | ६९२१=२० |
| ४५ | ३२ ॲम्पीयर बेस व टॉप फ़्युज<br>नामांकित कंपनी | प्रती १ नग | ७९=०० |
| ४६ | ६३ ॲम्पीयर बेस व टॉप फ़्युज<br>नामांकित कंपनी | प्रती १ नग | १८५=९० |
| ४७ | १०० ॲम्पीयर बेस व टॉप फ़्युज<br>नामांकित कंपनी | प्रती १ नग | ३००=३० |
| ४८ | २०० ॲम्पीयर बेस व टॉप फ़्युज<br>नामांकित कंपनी | प्रती १ नग | ४९३=९० |
| ४९ | ६५० व्ही.ए.यु.पी.एस. १२ व्होल्ट<br>कंपनी स्वस्तिक / बजाज /विप्रो | प्रती १ नग | ८३००=०० |
| ५० | ७५० व्ही.ए.यु.पी.एस. १२ व्होल्ट<br>कंपनी स्वस्तिक / बजाज /विप्रो | प्रती १ नग | ९३१४=८० |
| ५१ | ८०० व्ही.ए.यु.पी.एस. १२ व्होल्ट<br>कंपनी स्वस्तिक / बजाज /विप्रो | प्रती १ नग | १०६००=०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ५२ | १४०० व्ही.ए.यु.पी.एस. २४ व्होल्ट<br>कंपनी स्वस्तिक / बजाज /विप्रो | प्रती १ नग | १३६००=०० |
| ५३ | १५० ॲम्पिअर ट्युबलर बॅटरी<br>कंपनी - मायक्रोटेक्स / एस.एफ़ स्टॅन /ओकाया / एक्साईड. | प्रती १ नग | १६९००=०० |
| ५४ | २०० ॲम्पिअर ट्युबलर बॅटरी<br>कंपनी- मायक्रोटेक्स / एस.एफ़ स्टॅन /ओकाया / एक्साईड. | प्रती १ नग | २१६१८=३० |
| ५५ | T- ५ २८ वॅट ४ फ़ुटी ट्युब<br>कंपनी क्रॉम्प्टन /फ़िलिप्स/विप्रो | प्रती १ नग | १३६=०० |
| ५६ | डी.ओ.फ़्युज लिंक ३३ के.व्ही. | प्रती १ नग | ५३=९०<br>५-१० AMP<br>१३२=३०<br>१६-६३ AMP |
| ५७ | ४० वॅट इलेक्ट्रॉनिक्स चोक<br>कंपनी क्रॉम्प्टन /फ़िलिप्स/विप्रो | प्रती १ नग | २४३=०० |
| ५८ | १५० वॅट डबल एन्डेड मेटल हॅलाईड टयुब कॉम्प्टन कंपनी | प्रती १ नग | ६३०=०० |
| ५९ | रबर हॅण्डग्लोज ३३००० व्होल्ट ३३ के.व्ही. | प्रती १ जोड | ७१९=०० |
| ६० | टेप बंडल १० मीटर ॲंकर /स्टील ग्रिप | प्रती १ नग | ११=२५ |
| ६१ | ४०० वॅट मेटल हॅलाईड टयुब कॉम्प्टन कंपनी | प्रती १ नग | १२५९=५० |
| ६२ | ४०० वॅट मेटल हॅलाईड चोक कॉम्प्टन कंपनी | प्रती १ नग | १७२५=९० |
| ६३ | १०० AMP कॉपर फ्युज वायर | प्रती १ किलो | १२९६=०० |
| ६४ | टपारिया टेस्टर ८१३ | प्रती १ नग | ४५=०० |
| ६५ | टपारिया पक्कड इले. १६२७/८ | प्रती १ नग | २०२=५० |
| ६६ | टपारिया स्क्रू ड्रायव्हर स्लीव्हसह ८२५ | प्रती १ नग | ५६=७० |
| ६७ | टपारिया स्क्रू ड्रायव्हर स्लीव्हसह ८२४ | प्रती १ नग | ५४=०० |
| ६८ | टपारिया स्क्रू ड्रायव्हर स्लीव्हसह ८८३५ | प्रती १ नग | ४५=०० |
| ६९ | टपारिया क्रॉसपीन हॅमर १/२ kg | प्रती १ नग | २२६=८० |
| ७० | टपारिया स्पॅनर सेट | प्रती १ सेट | २४७=५० ,६/२२<br>६४८=००,६/३२ |
| ७१ | ड्रिल मशिन ब्लॅक ॲण्ड डेकर मेक १२mm | प्रती १ नग | २५७५=८० |
| ७२ | इन्डस्ट्रियल सेफ्टि इलेक्ट्रिक हॅण्ड ग्लोव्हज | प्रती १ जोड | ६०७=५० |
| ७३ | टॉग टेस्टर | प्रती १ नग | २७५४=०० |
| ७४ | इव्हरीडे एल.ए.डी.बॅटरी | प्रती १ नग | २९७०० |
| ७५ | इलेक्ट्रिक बेल / रिमोट बेल | प्रती १ नग | १०४=५०<br>इलेक्ट्रिक बेल<br>५०७=१०<br>रिमोट बेल |
| ७६ | लेदर सेफ्टि शूज विथ स्टील टो | प्रती १ जोड | ६०७=५० |

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- सन२०१२-२०१३ या आर्थिक वर्षाकरिता लागणारे इलेक्टीक साहित्य उदा.४०वॅट टयुब,स्टार्टर व इतरसह खरेदी कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दरास मंजूरी देणेबाबत विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- तुम्ही वार्षिक टेंडर मंजूर करून घेता. परंतु कधीही सामान शिल्लक नसते

मा.सौ. खरमाळे सं. र:- तुम्ही सर्व्हे करून नंतर सामान मागवत जा म्हणजे प्रत्येकाच काम व्यवस्थीत होत जाईन.

इले. वि. प्रमुख श्री. सावळे :- सर्व्हे करून त्याप्रमाणे मागणी करत असतो.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- आयुक्तांनी तुम्हाला वॉर्ड वाईज काम करायला सांगितले तसे तुम्ही का करत नाही. नवीन एल.ई .डी. इले. फिटींग ब-याच भागात बसवल्यामुळे खर्च कमी लागेल.

इले.वि.प्रमुख श्री. सावळे : वॉर्ड प्रमाणेच कामे करतो. नागापुर, बोल्हेगांव इकडे जुन्या फिटींग वापरतो. बजेट मध्ये रू.२३ लाखाची तरतुद केलेली आहे. ती बजेटची रक्कम महानगरपालिकेचा हददीमध्ये इले. साहित्यासह खरेदी करणेकामी लागते.

मा.श्री.कवडे उ.खं. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ. गंधे सु.मो.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**<u>ठराव :-</u>**अहमदनगर महानगरपालिकेस सन२०१२-२०१३या आर्थिक वर्षाकरिता अहमदनगर महानगरपालिकेस लागणारे इलेक्टीक साहित्य उदा.४०वॅट टयुब,स्टार्टर,लॉक होल्डर, चोक, टयुब पट्टी,१५०वॅट सोडीयम बल्ब, सोडीयम चोक,इग्नेटर, कॉपर केबल,वायर,फॅन, मोटर पंप, मेनस्वीच स्टार्टर,फ्युज,यु.पी.एस. टयुबलर बॅटरी इ.इले.साहित्य खरेदी करणे कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा धारक मे. अर्हम एंजटरप्राईज, मुंबई यांनी निगोसिएशन अंती कमी करून दिलेले निविदा दरास प्रशासकीय निविदा छाननी समितीने केलेल्या शिफारसी प्रमाणे निविदा दरातील तुलनात्मक तक्त्यातील कॉलम क्र. १२ मध्ये नमुद दरास मंजुरी देण्यात येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

तसेच नामंजुर निविदाकार यांची निविदा बयाणा रक्कम त्यांना परत करणेस मंजुरी देण्यात येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. कवडे उमेश खंडेराव. सही /-

अनुमोदक :- मा.सौ.गंधे सुमन मोहनीराज सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक- १३

विषय क्रमांक- ६६ सोमवार दिनांक १७/१२/२०१२

ठराव क्रमांक- ६६ सोमवार दिनांक १७/१२/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या एकूण७८ वाहनांवर सन२०१२-२०१३ या सालाकरीता विमा उतरविणे कामी झालेला खर्च सन २०१२-२०१३चे अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा रू.३,५०,१७५/-जादा झालेला असल्याने सदर विमा रकमेचे समायोजन वाहन इन्शुरन्स लेखाशिर्षा खाली रूपये ६,००,०००/- व उर्वरीत रूपये ३,५०,१७५/- रकमेचे समायोजन नविन वाहन खरेदी या लेखा शिर्षकाखाली करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. मोटार व्हेईकल विभाग जा.क्र.१११ दि.१६/११/२०१२

विषय- अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा जादा झालेला खर्च रू.३,५०,१७५/- अंदाजपत्रक पुर्नर्विनियोजनात तरतुद करण्यास मान्यता मिळणेबाबत.

मा. सादर,

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की, मनपाच्या एकुण लहान मोठया अशा एकूण ७८ वाहनांचा विमा सन २०१२-२०१३ या सालाकरिता भरणेकामी सविस्तर ऑफिस रिपोर्ट लिहून त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात येवून एकूण रूपये ९,३५,९१८/- रूपयाचा धनादेश दि न्यु इंडिया इंन्शुरन्स कंपनी लिमिटेड यांचे नावे काढण्यात येवून सदरचा धनादेश दि न्यु इंडिया इन्शुरन्स कंपनी लिमिटेड अहमदनगर शाखा येथे जमा करून एकुण मनपाच्या ७८ लहान मोठया वाहनांचा सन २०१२-२०१३ च्या पॉलिसी घेण्यात आल्या सदरचा धनादेश दि न्यु इंडिया इन्शुरन्स कंपनी येथे जमा केल्याबाबत त्यांच्याकडून चेक जमा पावती सुध्दा घेण्यात आलेली आहे.

तथापि अहमदनगर महानगरपालिकेने सन २०१२-२०१३ ची अंदाजपत्रकीय वाहन इन्शुरन्स या लेखाशिर्षासाठी फक्त रूपये ६,००,०००/- ची तरतुद केलेली आहे. परंतु कामाची गरज निकड पहाता सदरची वाहने हि नगरपालिका हद्दीमध्ये दैनंदिन कामासाठी फिरतात त्यामुळे एखादी दुर्घटना होवून अपघात होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यासाठी एकूण ७८ वाहनांचा सन २०१२-२०१३ या आर्थिक सालासाठी विमा हप्ता रू.९,३५,९१८/- इतका भरावा लागला सदचा खर्च अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा रूपये ३,५०,१७५/- इतक्या रक्कमेने जादा झाला आहे.

तरी रू.३,५०,१७५/- तरतुदी पेक्षा जादा झालेला खर्च दुस-या नविन वाहन खरेदी यासाठी रू.१२,००,०००/- तरतुद केलेली असुन सदरचा खर्च हा आज अखेर निरंक असुन सदर लेखाशिर्षकामधुन रू.३,५०,१७५/- चा जादा झालेला खर्च अंदाजपत्रक पुर्नर्विनियोजन करून सदर लेखाशिर्षकामधून करण्यास मान्यता मिळावी ही विनंती. तसेच इन्शुरन्स पोटी घेतलेल्या रक्कम रूपये ९,३५,९१८/- इतक्या रक्कमेचे समायोजन करण्यास मान्यता मिळावी ही विनंती.

येणे प्रमाणे व्हेईकल क्लार्क यांचा अहवाल असे.

यावर मोटार व्हेईकल यांचा अभिप्राय की, अहवालात नमूद प्रमाणे मान्यता मिळणेस मंजुरीस्तव सादर.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय ही, प्रस्तावानुसार अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा जादा झालेला खर्च रक्कम रूपये ३,५०,१७५/- अंदाजपत्रकीय पुनर्विनियोजन तरतुद मान्य झाल्यानंतर समायोजनीत करणे उचित वाटते. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे नियम १०१ प्रमाणे यास मा. स्थायी समितीची मान्यता घेणे अनिवार्य ठरते.

यावर मुख्य लेखा अधिकारी यांचा अभिप्राय की, प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यतेस ठेवणे आवश्यक वाटते.

यावर उपायुक्त (सा /कर) यांचा अभिप्राय की, सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर पाठविणे उचित सबब आदेशार्थ.

यावर आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, मान्य दि.९/११/२०१२

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- मनपाच्या एकूण७८ वाहनांवर सन२०१२-२०१३ या सालाकरीता विमा उतरविणे कामी झालेला खर्च सन२०१२-२०१३चे अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा जादा झालेला असल्याने सदर विमा रकमेचे समायोजन वाहन इन्शुरन्स लेखाशिर्षा खाली रक्कम व उर्वरीत रकमेचे समायोजन नविन वाहन खरेदी या लेखाशिर्षकाखाली करणेस मंजूरीमिळणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री.सातपुते दि.ना. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ.गंधे सु.मो. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या एकूण७८ वाहनांवर सन२०१२-२०१३ या सालाकरीता विमा उतरविणे कामी झालेला खर्च सन २०१२-२०१३चे अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा रू.३,५०,१७५/-जादा झालेला असल्याने सदर विमा रकमेचे समायोजन वाहन इन्शुरन्स लेखाशिर्षा खाली रूपये ६,००,०००/-व उर्वरीत रूपये ३,५०,१७५/- रकमेचे समायोजन नविन वाहन खरेदी या लेखा शिर्षकाखाली करणेस मंजूरी देण्यांत येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर. नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. सातपुते दिलीप नानाभाउ सही /-

अनुमोदक :- मा.सौ. गंधे सुमन मोहनीराज. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- १३**

विषय क्रमांक- ६७ सोमवार दिनांक १७/१२/२०१२

ठराव क्रमांक- ६७ सोमवार दिनांक १७/१२/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** श्री. शांताराम सोन्याबापु गहिले अ.नगर यांना व्यवसायासाठी अमरधाम गेट जवळील १०X१० चौ. फुट या मोजमापाची जागा भाडेतत्वावर १ वर्षासाठी दरमहा भाडे रू.४००/- अनामत रक्कम रू.२०,०००/- घेणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. मार्केट विभाग दि.२७/११/२०१२

प्रस्तावना-विषय- श्री. शांताराम सोन्याबापु गहिले अ.नगर व्यवसासायाठी अमरधाम गेट जवळील १०x१० चौ.फुट या मोजमापाची जागा भाडेतत्वावर मिळणेस दि.१२/७/२०१२ रोजीचा अर्ज

विनंतीपुर्वक अहवाल मार्केट विभागामार्फत देण्यात येतो की, विषयांकित जागा मिळणेबाबत अर्जदार यांनी दि.१२/७/२०१२ रोजी नगररचना विभागाकडे अर्ज केलेला आहे.

अर्जदार यांनी मागणी केलेली जागा देणेस हरकत नाही. असे मा. नगररचनाकार यांनी जा.क्र./टी.पी./२३०९ दि.३१/८/२०१२ अन्वये इकडेस कळविले आहे. परंतु सदर पत्रामध्ये अर्जदार यांचेकडून दरमहा भाडे अनामत रक्कम किती घ्यावी. याचा अभिप्राय दिलेला नसल्यामुळे नगररचना विभागास जा.क्र. /मार्केट / ११३ दि.१५/९/२०१२ अन्वये दरमहा भाडे अनामत रक्कम ठरवुन मिळणेबाबत कळविले आहे.

मा.नगररचनाकार यांनी १०x१० चौ. फुट या मोजमापाची जागा १ वर्षासाठी दरमहा भाडे ४००/- अनामत रक्कम रू.२०,०००/- घेउन सदर प्रकरण मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७९ मधील तरतुदीनुसार सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर घेणेबाबत मा.आयुक्त सो. , मा. उपायुक्त (कर) यांनी मान्यता दिलेली आहे. सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर घेणेसाठी आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे मार्केट विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- श्री. शांताराम सोन्याबापु गहिले अ.नगर यांना व्यवसायासाठी अमरधाम गेट जवळील १०X१० चौ. फुट या मोजमापाची जागा भाडेतत्वावर १ वर्षासाठी दरमहा भाडे अनामत रक्कम घेणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- जागा कशी काय देण्यांत येत आहे.

मार्केट विभाग प्रमुख श्री. दिवाण :-अर्ज आल्यानंतर आपण नगररचना विभागाकडे पाठवतो ते जागा पाहून आल्यावर त्यांच्या अहवालानुसार आपण जागा देतो.

नगररचनाकार श्री. दहे :- रिकामी जागा अंत्यविधीचे साहित्य विक्रीकरीता जागा हवी आहे.

मा.श्री. कवडे उ.खं. :- तिथ जागा उपलब्ध नाही. तिथ विसाण्याचा ओटा व इले. डि.पी.आहे.

मा.श्री.डागवाले कि.आ.:-जे ठिकाण आहे ते चुकीच आहे. इले. डि.पी. मुळे एखादी दुर्घटना झाल्यास जबाबदार कोण

मा.श्री.जगताप नि.वि.:-केडगावमधील एक अपंगाने आपल्याकडे जागेची मागणी केली असता आपण त्याला दिली नाही. एकला म्हणतात जागा नाही देता येत एकाला म्हणतात देता येते अस का ?

नगरचनाकार श्री. दहे :- त्यांनी अर्ज केल्यानंतर आपण नियमात असेल तर देवू.

मा.श्री. सातपुते दि.ना. :- भुषणनगर येथे रयत शिक्षण संस्थेने शाळेकरीता शाळे जवळील रिकामी जागेची मागणी केली असता आपण त्यांना दिली नाही.

नगररचनाकार श्री. दहे :- शाळेला लागून रिकामी जागा आपण देउ शकतो.

मा.श्री. सातपुते दि.ना.:-अनाधिकृत बांधकाम असेल तिथ शाळा चालू असेल तर तुम्ही पाडणार का ?

नगररचनाकार श्री. दहे :- जर अनाधिकृत असेल तर नक्की पाडणार

मा.श्री.सातपुते दि.ना. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा. सौ. गंधे सु.मो. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेची जागा अर्जदार श्री. शांताराम सोन्याबापु गहिले अ.नगर यांना व्यवसायासाठी अमरधाम गेट जवळील १०X१० चौ. फुट या मोजमापाची जागा भाडेतत्वावर १(एक) वर्षासाठी दरमहा भाडे रू.४००/- (रू.चारशे फक्त)अनामत रक्कम रू.२०,०००/- (रू. वीस हजार फक्त) देण्यांस ऑफिस रिपोर्टानुसार मंजुरी देण्यांत येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. सातपुते दिलीप नानाभाउ सही /-

अनुमोदक :- मा.सौ. गंधे सुमन मोहनीराज सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिति
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- १३**

विषय क्रमांक- ६८ — सोमवार दिनांक १७/१२/२०१२

ठराव क्रमांक- ६८ — सोमवार दिनांक १७/१२/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्नीशियन या पदावर अटी व शर्ती सौ.मोरे पल्लवी दगडू यांची केलेल्या करारबध्द मानधनावरील वरील नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. आस्थापना विभाग दि.०२/११/२०१२

विषय- रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्नीशियन या यापदी मोरे पल्लवी दगडु यांची अटी व शर्ती नुसार दरमहा मानधनावर सहा महिन्याकरिता करारबध्द नियुक्ती करणेस व त्यास कार्योत्तर मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणे बाबत.

संदर्भ- रक्तपेढी जा.क्र. १३५ दिनांक ०१/११/२०१२ अन्वयेचा प्रस्ताव

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की, रक्तपेढी विभाग जा.क्र. १३५ दिनांक ०१/११/२०१२ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये सौ. पल्लवी दगडु मोरे (लॅब टेक्नीशियन) यांना जा.क्र. आस्थापना / कंत्राटी करारबध्द नेमणूक ७३९ दिनांक १७/०५/२०१२ अन्वये दिनांक १७/०५/२०१२ पासून सहा महिन्यासाठी नेमणूक आदेश देण्यात आलेले होते. त्यांचे नेमणूक आदेश संपत आल्याने तसेच त्यांचे आता पर्यतचे काम हे समाधानकारक असल्याने तसेच कामाची निकड पाहता त्यांचे पुढील आदेश निघण्यांस मंजुरीबाबत नमुद करून सुचित केलेले आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये खालील प्रमाणे नमुद केलेले आहे.

**५३:- नेमणुकीचा अधिकार कोणामध्ये निहीत असणे.**

(१) महानगरपालिकेच्या जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे. मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत- त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकामध्ये निहीत असेल.

परंतु आयुक्ताला महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर असलेल्या कर्ज विषयक कामांसाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमणुका सहा महिन्यांहुन अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने या अटीवर करता येतील की आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणूक करताना त्या विषयी महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहिजे आणि उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पुर्व मंजुरी वाचुन अशा कोणत्याही नेमणुकीचे नवीकरण करता येणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपालिका मुख्य लेखापरिक्षक व नगरपालिका सचिव यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखालील नगरपालिका अधिकारी व कर्मचारी मग ते तात्पुरते असोत किंवा कायम असेता -यांची नेमणूक करण्याचा अधिकार कोणत्याही बाबतीत स्थायी समितीची मान्यता मिळविण्याचा अधीन, यथास्थिती, नगरपालिका मुख्य लेखा परिक्षक किंवा नगरपालिका सचिव यांच्याकडे निहीत असेल. मात्र, कोणत्याही विशिष्ट प्रकरणात किंवा प्रकरणांच्या वर्गात अशा मान्येतची आवश्यकता नाही असे उक्त समितीने ठरविले तर अशी मान्यता घेण्याची आवश्यकता असणार नाही.

(३) या अधिनियमात अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त , नगरपालिका अधिकारी व कर्मचारी- मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत- याची नेमणूक करण्याचा अधिकार आयुक्तांकडे निहीत असेल.

परंतु, कायम नेमणुकांच्या बाबतीत असा अधिकार कलम ५१ अन्वये तयार केलेल्या व मंजुर केलेल्या, त्यावेळी अंमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधीर असेल. आणखी असे की, आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्व मंजुरी वाचुन कोणतीही तात्पुरती नेमणूक सहा महिन्याहुन अधिक असेल अशा कोणतयाही कालावधीसाठी करता येणार नाही आणि लिपिक या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदाच्या वेतनाएवढे अथवा त्याहुन अधिक वेतन असलेल्या कोणत्याही नेमणुकीचे उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार नाही." असे नमुद केलेले आहे.

रक्तपेढी विभाग जा.क्र. ६० दिनांक २५/१०/२०११ च्या प्रस्तावाच्या अनुषंगाने रक्तपेढी विभागामध्ये तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्निशियन यापदी कंत्राटी करारानुसार श्रीमती मोरे पल्लवी दगडु यांची जा.क्र. आस्थापना / कंत्राटी करारबध्द नेमणुक ७३९ दिनांक १७/०५/२०१२ अन्वये दिनांक १७/०५/२०१२ पासून सहा महिन्याकरिता अटी व शर्ती नुसार रू.१३,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती करण्यांत आलेली आहे. सदरची मुदत ही समाप्त होत आहे.

वरील कंत्राटी करारबध्द कालावधीतील केलेल्या नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेकरिता मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १३ दिनांक ३१/४/२०१२ च्या ठरावाच्या अनुषंगाने सदरचा प्रस्ताव इकडील जा.क्र. १५१ दिनांक १९/५/२०१२ अन्वये मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात आलेला होता. सदरच्या प्रस्तावास मा.स्थायी समिती ठराव क्रमांक २७ दिनांक २३/५/२०१२ अन्वये ठराव पारित करून त्यास मान्यता दिलेली आहे.

यापुर्वी फिरत्या दवाखान्याकरीता तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदावर कंत्राटी करारानुसार दरमहा मानधनावरचा प्रस्ताव निर्णयासाठी मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात आलेला होता. सदर प्रस्तावावर मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १३ दिनांक ३०/४/२०१० अन्वये ठराव पारित होवुन त्यामध्ये परिच्छेद २ मध्ये खालीलप्रमाणे नमुद केलेले आहे.

तसेच नागरिकांच्या सुविधेच्या दृष्टीकोनातून फिरता दवाखाना तसेच आरोग्याच्या सर्व सेवा अत्यावश्यक असल्याने यापुढे वैद्यकीस अधिकारी, लॅब टेक्नीशियन , नर्सेस इ. चे काम समाधानकारक असल्यास त्यांचे पुनर्नेमणूक १ दिवस तांत्रिक खंड देवुन त्यांना नेमणूका देण्यात याव्यात व प्रस्ताव अंतीम मंजुरीसाठी मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात यावेत." असे नमुद करून सुचित केलेले आहे.

वरील रक्तपेढी विभाग जा.क्र. १३५ दिनांक ०१/११/२०१२ च्या प्रस्तावाच्या अनुषंगाने रक्तपेढी विभागाकरिता मोरे पल्लवी दगडु यांची कंत्राटी कराराप्रमाणे अटी व शर्ती नुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्नीशियन यापदी तांत्रिक खंड देवुन सहा महिन्याकरिता रू.१३,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती करणेबाबत निर्णय झाल्यास सदर कंत्राटी करारानुसार केलेल्या कालावधीतील करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे करिता सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १३ दिनांक ३०/४/२०१० च्या झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने मा. स्थायी समितीकडे पाठवावा लागेल. /**अ**

तरी याबाबत मा.मुख्य लेखा परिक्षक व मा. मुख्या लेखाधिकारी यांचा अभिप्राय होवुन सदरचा प्रस्ताव निर्णयास्तव आदेशार्थ सविनय सादर.

**सोबत-** सदर कंत्राटी कराराप्रमाणे अटी व शर्ती नुसार मानधनावर करारबध्दसाठी नियुक्ती आदेशाबाबतची प्रारूप प्रत.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर प्र. सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की, मु.ले.प. / मु.ले.अ. यांचे मार्फत सादर करा.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, आस्थापना प्रमुख व सहाय्यक आयुक्त यांनी प्रस्तावीत केलेले आहे. याप्रमाणे तद्वतच रक्तपेढी प्रमुख व मु. आरोग्य अधिकारी यांचे शिफारशीप्रमाणे सौ. पल्लवी दगडू मोरे (लॅब टेक्नीशियन) यांची तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्नीशियन यापदी तांत्रिक खंड देवून सहा महिन्याकरिता रू.१३०००/- तेरा हजार दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती करणेबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीचे मान्यतेस सादर करण्यास हरकत वाटत नाही.

यावर मुख्य लेखाधिकारी यांचा अभिप्राय की, प्रस्तावाप्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर उपायुक्त (सा./कर) यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत **"अ"** प्रमाणेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, प्रस्तावीत **"अ"** नुसार मान्य मात्र प्रस्तावात नेमणूक कालावधी स्पष्टपणे नमूद करावा.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेकरीता मोरे पल्लवी दगडू यांची तात्पुरत्या स्वरूपात लॅंब टेक्नीशियन या पदावर अटी व शर्ती प्रमाणे कंत्राटी करारानुसार दरमहा मानधनावर सहा महिन्याच्या कालावधी करिता केलेल्या करारबध्द नेमणूकीस कार्योत्तर मंजुरी मिळणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. शेख अरिफ शे. र. :- कार्योत्तर मंजूरी असल्याने ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा. सौ. खरमाळे सं.र. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा

मा.सभापती साहेब :- कार्योत्तर मंजूरी असल्याने ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेकरीता मोरे पल्लवी दगडू यांची तात्पुरत्या स्वरूपात लॅंब टेक्नीशियन या पदावर अटी व शर्ती प्रमाणे कंत्राटी करारानुसार दरमहा रूपये १३,०००/-(रूपये तेरा हजार फक्त) या मानधनावर दिनांक २०/११/२०१२ पासून सहा महिन्याच्या कालावधी करिता केलेल्या करारबध्द नेमणूकीस कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.शेख अरिफ शेख रफिउद्दीन सही /-

अनुमोदक :- मा.सौ. खरमाळे संगीता रत्नाकर. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- १३**

विषय क्रमांक- ६९ सोमवार दिनांक १७/१२/२०१२

ठराव क्रमांक- ६९ सोमवार दिनांक १७/१२/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी तथा संक्रमण अधिकारी या पदांवर अटी व शर्ती नुसार डॉ. रूपाली आनंद कुलकर्णी यांची केलेल्या करारबध्द मानधनावरील नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. आस्थापना विभाग दि.६/११/२०१२

विषय- रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी तथा संक्रमण अधिकारी या पदांवर अटी व शर्ती नुसार डॉ. रूपाली आनंद कुलकर्णी यांची केलेल्या करारबध्द मानधनावरील नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती कडे पाठविणे बाबत.

संदर्भ- कै.बा. दे. दवाखाना व सुतिका गृह जा.क्र. ७२० दिनांक २२/१०/२०१२ चा प्रस्ताव.

सादर,

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की, मा.मुख्य वैद्यकीय अधिकारी , कै.बा.दे.दवा. यांनी त्यांचे कडील जा.क्र. ७२० दिनांक २२/१०/२०१२ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये "जा.क्र. आस्थापना कंत्राटी नेमणूक दिनांक २५/०४/२०१२ अन्वये डॉ.सौ. रूपाली कुलकर्णी यांची वैद्यकीय अधिकारी रक्तपेढी विभाग या पदावर कंत्राटी पध्दतीने सहा महिन्याकरिता नेमणूक करण्यात आलेली होती. सदरच्या नेमणूकीचा कालावधी दिनांक ०३/०५/२०१२ ते ०२/११/२०१२ असा असून सदरचा कालावधी दिनांक २/११/२०१२ रोजी संपत आहे. सदरचा कालावधीमध्ये त्यांचे काम समाधानकारक आहे. त्यांनी पुढील कालावधीसाठी पुनर्नेमणुक करणेबाबत विनंती अर्ज केलेला आहे. त्यांना नियमाप्रमाणे एक दिवसाचा तांत्रिक खंड देउन दिनांक ४/११/२०१२ ते ३/०५/२०१३ अखेर सहा महिन्याकरिता वैद्यकीय अधिकारी रक्तपेढी विभाग यापदावर पुनर्नेमणूक करणेस शिफारस आहे." असे नमुद करून सुचित केलेले आहे.

प्र. मुख्य वैद्यकीय अधिकारी यांचेकडील दिनांक २८/३/२०१२ च्या प्रस्तावाच्या अनुषंगाने कै.बा.दे. दवाखाना येथे कंत्राटी करारानुसार दिनांक ३/५/२०१२ ते २/११/२०१२ अखेर सहा महिनयाकरिता तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ.सौ. रूपाली कुलकर्णी यांची मानधनावर अटी व शर्ती नुसार करारबध्द नियुक्ती करण्यात आलेली होती. तथापि डॉ. रूपाली आंनद कुलकर्णी यांनी दिनांक २३/४/२०१२ रोजी विनंती अर्ज देवुन रक्तपेढी विभागात रक्त संक्रमण अधिकारी या पदावर काम करणेस तयार आहे. रक्त संक्रमण अधिकारी पदाच्या जाहिराती नुसार दिलेले मानधन दरमहा रूपये २०,०००/- कमी आहे. कामाचा अनुभव लक्षात घेता दरमहा रूपये ३०,०००/- मानधन देणेस व सदर पदावर सहा महिने काम करणेसाठी नेमणूक द्यावी असे नमुद केलेले आहे. त्यानुषंगाने सादर करण्यात आलेल्या प्रस्तावावर मा.प्र.आरोग्याधिकारी यांनी दिनांक २४/४/२०१२ रोजी रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेकरिता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी तथा रक्त संक्रमण अधिकारी या पदाकरिता दिनांक २/४/२०१२ रोजीच्या प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे भरती प्रक्रिया राबविण्यात आली परंतु डॉक्टर न मिळाल्याने पद भरले नाही.

डॉ. कुलकर्णी यांचा अर्ज व अनुभवाचा विचार करता व मा.आयुक्त व मा. महापौर यांचेशी झालेल्या चर्चेनुसार आणि रक्तपेढी पुनश्चः सुरू करणेसाठी रक्तपेढी रक्त संक्रमण अधिकारी यांची अत्यावश्यक लक्षात घेता संबंधीत डॉक्टरांना रक्त संक्रमण अधिकारी या पदावर कंत्राटी पध्दतीने नियुक्ती देणे उचित वाटते." असे नमुद करून अभिप्राय दिलेला होता.

त्यानुषंगाने अहवाल सादर करून रक्तपेढी विभागाकरिता तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी तथा रक्त संक्रमण अधिकारी या पदी कंत्राटी कराराप्रमाणे मानधनावर करारबध्द भरती करीता वेळोवेळी वर्तमान पत्रामध्ये जाहिराती प्रसिध्दीस देण्यात आलेल्या होत्या. परंतु उमेदवाराच उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेचा तातडीने विचार होवुन त्यानुसार मंजुरी अहवालाच्या अनुषंगाने जा.क्र.आस्था./ कंत्राटी करारबध्द नेमणूक १९४ दिनांक २५/४/२०१२ अन्वये डॉ.रूपाली आनंद कुलकर्णी यांची जा.क्र. आस्था. १५६ दिनांक २३/४/२०१२ अन्वये कै.बा.दे. दवाखाना येथे वैद्यकीय अधिकारी या पदी केलेली सहा महिन्याची नियुक्ती रद्द करून रक्तपेढी विभागाकरिता तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी तथा रक्त संक्रमण अधिकारी या पदी दरमहा मानधन रू.२०,०००/- यावर अटी व शर्ती नुसार करारबध्द करण्यात येवुन नियुक्ती आदेश निर्गमित केलेले होते. व सदरच्या आदेशामध्ये अट क्रमांक ९ प्रमाणे विंनती अर्जानुसार मानधनवाढी संदर्भात मा.स्थायी समितीच्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल." असे नमुद करून सुचित केलेले होते.

सदर केलेल्या कंत्राटी करारबध्द मानधनावरील नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे करिता सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती कडे जा.क्र. आस्था.१३५ दिनांक २७/४/२०१२ अन्वये पाठविण्यात आलेला होता.

त्यानुसार मा.स्थायी समिती ठराव क्रमांक २२ दिनांक २३/५/२०१२ अन्वये सदर केलेलया कंत्राटी करारबध्द मानधनावरील नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी दिलेली आहे व त्यामध्ये मानधन वाऐ संदर्भात सविस्तर प्रस्ताव तातडीने सादर करणेबाबत सुचित केलेले होते.

सौ. रूपाली कुलकर्णी यांची वरील केलेल्या कंत्राटी करारबध्द मानधनावरील करारबध्द नियुक्तीची मुदत ही सद्यस्थितीमध्ये दिनांक २/११/२०१२ रोजी संपलेली आहे.

डॉ.सौ.रूपाली आनंद कुलकर्णी यांची शैक्षणिक पात्रता ही एम.बी.बी. एस.धारण केलेली असल्याने त्यानुषंगाने सदर मानधनवाढी संदर्भात बाबतचा प्रस्ताव जा.क्र. आस्थापना १५९ दिनांक १/६/२०१२ अन्वये मा.स्थायी समितीकडे निर्णयाकरिता पाठविण्यात आलेला होता.

सदर प्रस्तावावर मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ३५ दिनांक १४/८/२०१२ अन्वये खालीलप्रमाणे ठराव पारित केलेला आहे.

अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना, रक्तपेढी विभाग तसेच फिरता दवाखाना या अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात नेमावयाच्या वैद्यकीस अधिकारी / रक्त संक्रमण अधिकारी या पदांचे खाली दर्शविलेल्यानुसार मानधन वाढविण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

| अ.नं. | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | सध्याचे कंत्राटी करारबध्द दरमहा मानधन | प्रस्तावीत कंत्राटी दरमहा मानधन |
|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी | १५,०००/- | २५,०००/- |
| २ | वैद्यकीय अधिकारी तथा संक्रमण अधिकारी | २०,०००/- | २५,०००/- |
| ३ | वैद्यकीय अधिकारी | १०,०००/- | २०,०००/- |

ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर. नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी" असे नमुद केलेले आहे.

त्यानुषंगाने डॉ.सौ. रूपाली आनंद कुलकर्णी यांची जा.क्र. आस्था.४६१३ दिनांक ६/११/२०१२ अन्वये दिनांक १४/८/२०१२ पासून ते दि.२/११/२०१२ पय्रत या कालावधीमध्ये दरमहा मानधन रूपये २५,०००/- करण्यात आलेले आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये खालील प्रमाणे नमुद केलेले आहे.

**५३:- नेमणुकीचा अधिकार कोणामध्ये निहीत असणे.**

(१) महानगरपालिकेच्या जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे - मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत- त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकामध्ये निहीत असेल.

परंतु आयुक्ताला महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर असलेल्या कर्ज विषयक कामांसाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमणुका सहा महिन्यांहुन अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने या अटीवर करता येतील की आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणूक करताना त्या विषयी महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहिजे आणि उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पुर्व मंजुरी वाचुन अशा कोणत्याही नेमणुकीचे नवीकरण करता येणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपालिका मुख्य लेखापरिक्षक व नगरपालिका सचिव यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखालील नगरपालिका अधिकारी व कर्मचारी मग ते तात्पुरते असोत किंवा कायम असेता -यांची नेमणूक करण्याचा अधिकार कोणत्याही बाबबीत स्थायी समितीची मान्य मिळविण्याचा अधीन, यथास्थिती, नगरपालिका मुख्य लेखा परिक्षक किंवा नगरपालिका सचिव यांच्याकडे निहीत असेल. मात्र, कोणत्याही विशिष्ट प्रकरणात किंवा प्रकरणांच्या वर्गात अशा मान्यतेची आवश्यकता नाही असे उक्त समितीने ठरविले तर अशी मान्यता घेण्याची आवश्यकता असणार नाही.

(३) या अधिनियमात अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त , नगरपालिका अधिकारी व कर्मचारी- मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत- याची नेमणूक करण्याचा अधिकार आयुक्तांकडे निहीत असेल.

परंतु, कायम नेमणुकांच्या बाबतीत असा अधिकार कलम ५१ अन्वये तयार केलेल्या व मंजुर केलेल्या, त्यावेळी अंमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधीर असेल. आणखी असे की, आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्व मंजुरी वाचुन कोणतीही तात्पुरती नेमणूक सहा महिन्याहुन अधिक असेल अशा कोणतयाही कालावधीसाठी करता येणार नाही आणि लिपिक या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा

त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदाच्या वेतनाएवढे अथवा त्याहुन अधिक वेतन असलेल्या कोणत्याही नेमणुकीचे उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार नाही." असे नमुद केलेले आहे.

यापुर्वी फिरत्या दवाखान्या करीता तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदावर कंत्राटी करारानुसार दरमहा मानधनावरचा प्रस्ताव निर्णयासाठी मा.स्थायी समिती कडे पाठविण्यात आलेला होता. सदर प्रस्तावावर मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १३ दिनांक ३०/४/२०१० अन्वये ठराव पारीत होवुन त्यामध्ये परिच्छेद २ मध्ये खालीलप्रमाणे नमुद केलेले आहे.

"तसेच नागरिकांच्या सुविधेच्या दृष्टीकोणनातून फिरता दवाखाना तसेच आरोग्याच्या सर्व सेवा अत्यावश्यक असल्याने यापुढे वैद्यकीय अधिकारी, लॅब टेक्नीशियन , नर्सेस इ.चे काम समाधानकारक असल्यास त्यांचे पुनर्नेमणुक १ दिवस तांत्रिक खंड देवुन त्यांना नेमणूक देण्यात याव्यात व प्रस्ताव अंतीम मंजुरी साठी मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात यावेत" असे नमुद करून सुचित केलेले आहे.

वरील कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह जा.क्र. ७२० दिनांक २२/१०/२०१२ च्या प्रस्तावाच्या अनुषंगाने रक्तपेढी विभागाकरिता डॉ.सौ. रूपाली आनंद कुलकर्णी यांची कंत्राटी कराराप्रमाणे अटी व शर्ती नुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी तथा रक्त संक्रमण अधिकारी यापदी तांत्रिक खंड देवून दिनांक ४/११/२०१२ ते ०३/०५/२०१३ अखेर सहा महिन्याच्या कालावधी करिता मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ३५ दिनांक १४/८/२०१२ च्या ठरावाच्या अनुषंगाने रू.२५०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती करणेबाबत निर्णय झाल्यास उपरोक्त मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १३ दि.३०/४/२०१० च्या झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने सदर वरील कालावधीतील केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती कडे पाठवावा लागेल.**/अ**

तरी याबाबत मा.मुख्य लेखा परिक्षक व मा.मुख्या लेखाधिकारी यांचा अभिप्राय होवुन सदरचा प्रस्ताव निर्णयास्तव करीता आदेशार्थ सविनय सादर.

**सोबत-** सदर कंत्राटी कराराप्रमाणे अटी व शर्ती नुसार मानधनावर करारबध्दसाठी नियुक्ती आदेशाबाबतची प्रारूप प्रत.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर प्र. सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की, मु.ले.प. / मु.ले.अ. यांचा अभिप्राय घेणे.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, आस्थापना प्रमुख व सहा. आयुक्त यांनी प्रस्तावीत केलेले आहे. त्याप्रमाणे रक्तपेढी विभागाकरिता डॉ.सौ. रूपाली आनंद कुलकर्णी यांनी कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरूपात वै. अधिकारी तथा रक्त संक्रमण अधिकारी पदी तांत्रिक खंड देवुन दि.४/११/२०१२ ते ०३/०५/२०१३ करिता रू.२५०००/- पंचवीस हजार मानधनावर करारबध्द नियुक्ती करणेकरिता मा.स्थायी समिती कार्योत्तर मंजुरी करिता प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे मान्यतेस सादर करणेस हरकत वाटत नाही.

यावर मुख्य लेखा अधिकारी यांचा अभिप्राय की, प्रस्तावाप्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत **"अ"** प्रमाणेचा प्रस्ताव मंजुरीस्तव मा.स्थायी समितीपुढे निर्णयास्तव ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, मान्य दि.१७/११/२०१२

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी तथा संक्रमण अधिकारी या पदांवर अटी व शर्ती नुसार डॉ. रूपाली आनंद कुलकर्णी यांची केलेल्या करारबध्द मानधनावरील नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. शेख अरिफ शे. र. :- कार्योत्तर मंजूरी असल्याने ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा. सौ. खरमाळे सं.र. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- कार्योत्तर मंजूरी असल्याने ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्टानुसार अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेकरीता डॉ. रूपाली आनंद कुलकर्णी यांची तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी तथा रक्त संक्रमण अधिकारी या पदावर अटी व शर्ती प्रमाणे कंत्राटी करारानुसार दरमहा रूपये २५,०००/-(रूपये पंचवीस हजार फक्त) या मानधनावर दिनांक ४/११/२०१२ ते ३/५/२०१३ अखेर सहा महिन्याच्या कालावधी करिता केलेल्या करारबध्द नेमणूकीस कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. शेख अरिफ शेख रफिउद्दीन. सही /-

अनुमोदक :- मा.सौ. खरमाळे संगीता रत्नाकर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- १३**

विषय क्रमांक- ७० सोमवार दिनांक १७/१२/२०१२

ठराव क्रमांक- ७० सोमवार दिनांक १७/१२/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीत सन २०१२-२०१३ या वर्षाकरिता पारगमन शुल्क वसुलीकरिता अभिकर्ता नेमणूक प्रक्रिया बाबत अहमदनगर महानगरपालिकेचे मा.मुंबई उच्च न्यायालयाचे, औरंगाबाद खंडपीठ येथील विधी सल्लागार यांच्या अभिप्रायासह प्रशासकीय प्रस्ताव निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. जकात विभाग दि.११/१२/२०१२

विषय- सन २०१२-२०१३ करीता पारगमन शुल्क संकलन कामी अभिकर्ता नेमणूक प्रक्रिया बाबत.

फेरसादर,

मा.स्थायी समिती ठराव क्र.६२ दिनांक २९/११/२०१२ अन्वये विषयांकित निविदा प्रक्रियेच्या मुदती बाबत जा.क्र. जकात /३०१ दि.३०/११/२०१२ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेचे मुंबई उच्च न्यायायाचे, औरंगाबाद खंडपीठ येथील विधी सल्लागार यांचा कायदेशीर अभिप्राय मागविण्यात आला असता. श्री. व्ही.एस.बेद्रे यांनी दि.६/१२/२०१२ रोजी अहमदनगर महानगरपालिकेस खालील प्रमाणे अभिप्राय कळविलेला आहे.

१] मा.स्थायी समिती ठराव क्र.५० दि.७/११/२०१२ अन्वये पारगमन संकलनाकरीता नविन अभिकर्त्याची नेमणूकीसाठी निविदा प्रक्रिया किमान देकार रक्कमेची फेर निश्चिती करून नव्याने निविदा प्रक्रिया महाराष्ट्र शासनाचे दि.१९/४/२०११ चे परिपत्रक व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसूची "ड" प्रकरण ८ अन्वये हाती घेण्यात आलेली होती.

२] उपरोक्त शासन परिपत्रक व नियम तसेच ठराव क्र.५० चे अवलोकन केले असता किमान रक्कमेची निविदा प्रक्रिया हाती घेण्यात आलेली आहे. सदरचे तरतुदीप्रमाणे किमान एक महिन्याचा अवधी निश्चित केलेला आहे. तथापी सदर निविदा प्रक्रिया राबविताना केवळ १५ दिवसाचा अवधी दिलेला होता. सदरचा अवधी शासन निर्णयाप्रमाणे सुसंगत नाही. शासन निर्णयाप्रमाणे निविदा प्रक्रिया राबविताना किमान एक महिन्याचा अवधी देणे शासन निर्णयाप्रमाणे आवश्यक आहे.

३] किमान कालावधी उपरोक्त निविदा प्रक्रिया राबविताना दिल्यास सदर निविदास जास्तीत जास्त प्रसिध्दी मिळते व जास्तीत जास्त निविदा धारकांना सदर निविदेमध्ये सहभागी होता यावे असा हेतुन शासन परिपत्रकातुन दिसुन येतो.

४] सबब अहमदनगर महानगरपालिकेने किमान देकार रक्कमेची फेर निश्चिती करून नव्याने निविदा प्रक्रिया राबविलेली आहे. सबब दि.७/११/२०१२, शासन परिपत्रक दि.१९/४/२०११ व मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे एकत्रीतरित्या विचार करून निविदा प्रक्रिया कमीत कमी एक महिन्याचा अवधी आवश्यक आहे. असे माझे मत आहे. तथापी आपण आपल्या स्तरावर योग्य तो निर्णय घ्यावा.

५] तसे भविष्य काळात सदर निविदा प्रकरणी कुठलाही तांत्रीक दोष राहु नये अथवा कायदेशीर अडचणी होवु नये तसेच सदरची बाब ही महानगरपालिकेच्या आर्थिक बाबी संबंधी निगडीत असल्याने शासन परिपत्रक दि.१९/४/२०११ चे मार्गदर्शक तत्वा प्रमाणे नव्याने निविदा मागविणे योग्य होईल असे माझे मत आहे. तथापी आपण आपल्या स्तरावर योग्य तो निर्णय घ्यावा. अशाबाबत अभिप्राय दिलेले आहेत.

अहमदनगर महानगरपालिकेने पारगमन शुल्काची परिगणना करून कार्यालयीन प्रस्ताव मान्यतेस्तव मा.स्थायी समिती कडेस सादर केला असता. मा.स्थायी समिती ठराव क्र.५० दि.७/११/२०१२ अन्वये खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आलेला आहे.

ठराव-अहमदनगर महानगरपालिका हद्दीत सन२०१२-२०१३या वर्षाकरीता मा.महासभा ठराव क्र.१३दि.११/७/२०१२अन्वये किमान देकार रक्कम रू.२८कोटी निश्चित करून पारगमन शुल्क वसुलीकामी अभिकर्ता नियुक्तीकरिता जाहिर ई-टेंडर निविदा मागविल्या असता.त्यास काहीही प्रतिसाद न मिळाल्याने मा.शासनाचे परिपत्रकानुसार पारगमन शुल्काची किमान देकार रक्कम रू.१९,९७,६७, ३७४/-(रू. एकोणीस कोटी सत्यान्नव लाख सदुसष्ठ हजार तीनशे चौ-याहत्तर मात्र) निश्चित करून त्यानुसार फेरनिविदा मागविणेस मंजुरी देण्यांत येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

तसेच मा. शासनाने जकात व पारगमन शुल्क अभिकर्त्याद्वारे करावयाचे प्रक्रिये संबंधात दि.१९ एप्रिल २०११ रोजी महानगरपालिकेस दिलेले निर्देश हे जकात व पारगमन ठेक्यासंबंधी मार्गदर्शक आहेत. त्यामधील बाब क्र. २ (१०) अन्वये फेर निविदा कालावधी १५ दिवसापर्यंत कमी करता येईल. तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसूची "ड" प्रकरण ५ मधील २(१) नुसार- कोणतीही संविदा करण्यापुर्वी निदान सात दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रातील जाहीरातीद्वारे नोटीस देउन निविदा मागविण्यात आल्या पाहिजेत अशाबाबत तरतुद आहे.

अहमदनगर महानगरपालिकेचे सद्याचे जकात अभिकर्ता मे.विपुल ऑक्ट्राय सेंटर यांच्याशी झालेल्या कराराची मुदत दि.३०/११/२०१२ रोजी संपुष्टात येत असल्याने व तत्पुर्वी निविदा प्रक्रिया पुर्ण व्हावी या उद्देशाने मा.स्थायी समिती ठराव क्र.५०दि.७/११/२०१२व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधि. १९४९अनुसूची "ड"प्रकरण५मधील २(१)नुसार महाराष्ट्र शासनाचे दि.१९/४/२०११चे परिपत्रकातील निर्देश क्र.२(१०)यांचा एकत्रीत विचार करता महानगरपालिकेने दि.७/११/२०१२ ते २२/११/२०१२या १५दिवसांचे कालावधीची फेर निविदा सुचना प्रसिध्दीस देउन ई निविदा प्रक्रिया राबविलेली आहे.

अहमदनगर महानगरपालिकेने पारगमन शुल्क संकलाना कामी १५ दिवसांचे ई - निविदा पध्दती अवलंबुन राबविलेल्या फेर निविदा प्रक्रियेसंबंधीत मा.शासनाकडेस किंवा महानगरपालिकेकडेस कोणत्याही निविदा धारकाने अथवा इतर कोणीही आक्षेप घेतलेला नाही. अथवा तशी कोणतीही लेखी हरकत अहमदनगर महानगरपालिकेकडेस प्राप्त झालेली नाही. **/अ**

अहमदनगर महानगरपालिकेच्या मा.स्थायी समिती ठराव क्र.५० दि.७/११/२०१२ अन्वये निश्चित केलेल्या किमान देकार रक्कम रू.१९,९७,६७,३७४/- यापेक्षा मे. मॅक्स लिंक, पुणे यांची रक्कम रू.२१ कोटी ६ लाख इतक्या देकार रक्कमेची निविदा ही सर्वात जास्त देकार रक्कमेची म्हणजे महानगरपालिकेने निश्चित केलेल्या किमान देकार रक्कमेपेक्षा रक्कम रू.१,०८,३२,६२६/- ने अधिक प्राप्त झालेली असल्याने अहमदनगर महानगरपालिकेचे आर्थिक हिताची आहे.**/ ब**

तथापी मा.स्थायी समिती ठराव क्र.६२ दि.२९/१२/२०१२ अन्वये सन २०१२-२०१३ करीता पारगमन शुल्कसंकलन कामी अभिकर्ता नेमणूक प्रक्रिया बाबत अहमदनगर महानगरपालिकेचे मुंबई उच्च न्यायालयाचे, औरंगाबाद खंडपीठ येथील विधी सल्लागार यांनी अहमदनगर महानगरपालिकेस कळविलेला उक्त कायदेशीर अभिप्राय व प्रशासकीय प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर निर्णयास्तव ठेवणे बाबत योग्य त्या आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे जकात अधिक्षक यांचा अहवाल असे.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, जकात अधिक्षक यांनी प्रस्तावीत केलेला बाबी व "अ" आणि "ब" मधील नमुद केलेले मत विचारात घेता आर्थिक हिताची बाब लक्षात घेउन यावर स्थायी समितीने निर्णय घ्यावा असे मत आहे.

यावर मुख्य लेखा अधिकारी यांचा अभिप्राय की, मुख्य लेखा परिक्षक यांचे मत "अ" व "ब" नमुद बाबी मा.स्थायी समितीसमोर ठेवणे उचित वाटते.

यावर उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, मुख्य लेखा परिक्षक यांच्या अभिप्रायानुसार मा.स्थायी समिती पुढे मनपा विधी सल्लागाराचे मत व त्याबाबतचा प्रशासकीय प्रस्ताव निर्णयास्तव पाठविणेस मान्यतेस्तव सादर.

यावर आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, नमूद अहवाल व त्यासोबत मनपाचे विधी सल्लागार यांचे मत व त्या वरील विभागाचा व उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय अवलोकन केली. यात अहवालात नमूद "अ" व "ब" या बाबी विचारात घेणे आवश्यक आहे. मुळातच शासनाचे परिपत्रकानुसार पारदर्शक निविदा प्रक्रिया मनपाने राबविली आहे व जास्तीत जास्त स्पर्धात्मक दर येणे साठीही प्रयत्न केला आहे. तथापि ३वेळा निविदा मागवुन ही निविदा न आल्याने मे. स्थायी समितीचे मान्यतेने किमान देकार रक्कम कमी करून नव्याने निविदा मागविली गेली व त्यास प्रतिसाद मिळालेला आहे व तो किमान देकार रकमेपेक्षा जास्त आला असलेने मनपाच्या आर्थिक हिताचा आहे असे माझे मत आहे यात निविदेची मुदत १५ दिवस ठेवणेबाबत कोणाही निविदा धारकाने हरकत घेतलेली नाही ही बाब विचारात घेणे आवश्यक आहे त्यातही ही मुदत १५ दिवस का ठेवणेत आली याबाबत अहवालात स्पष्ट खुलासा करणेत आला आहे. व तो मला समर्थनीय वाटतो. त्यामुळे विभागाचे मताचा गांभिर्याने विचार करून मनपाच्या आर्थिक हिताचे दृष्टीने मे. स्थायी समितीने निर्णय घ्यावा असे मत आहे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेबः-महानगरपालिका हद्दीत सन २०१२-२०१३ या वर्षाकरिता पारगमन शुल्क वसुलीकरिता अभिकर्ता नेमणूक प्रक्रिया बाबत अहमदनगर महानगरपालिकेचे मा.मुंबई उच्च न्यायालयाचे, औरंगाबाद खंडपीठ येथील विधी सल्लागार यांच्या अभिप्रायासह प्रशासकीय प्रस्ताव विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- मागील झालेला ठराव काय आहे ठराव वाचला.

मा.श्री.डागवाले कि.आ. :- आपण रकमेचा उल्लेख ठरावात केलेला नाही. पण जादा रक्कम घेणे हे प्रशासनाचे काम आहे. रोज १ लाख नुकसान होत आहे. विनाकारण स्थायी समिती बदनामी होत आहे.

उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे साहेब :- ठरावात मुदतवाढ हा शब्द आहे. स्टॅडींग कमिटीच्या निर्णयानेच विपुल ऑक्ट्रायला मुदतवाढ दिली.निविदा प्रक्रिया पुर्ण झालेली नाही.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- जी तफावत आढळते ती त्याच्याकडून वसुल करावी. आपला मुदत वाढाची ठराव आहे.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- प्रशासनाच्या हे लक्षात यायला पाहिजे होते.

मा.श्री.सातपुते दि.ना. :-आपल्या कर्मचा-यांनी सर्व्हेप्रमाणे रू.२० कोटी वसुल केले असते.कर्मचा-यां मार्फत वसुली का केली नाही.

उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे साहेब :- ठराव तसा झालेला आहे. आम्हांला अधिकार नाही. सर्व्हे हा एक अंदाज असतो.

मा.श्री. सातपुते दि.ना. :- प्रशासनाचे काम आहे हे नुकसान होईल असे निदर्शनास क ा आणले नाही. तुम्ही उदया टेंडर प्रक्रिया राबविणार का ?

उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे साहेब :- रू. २१ कोटी ६ लाख ची निविदा प्राप्त झालेली आहे. त्याचा निर्णय झालेला नाही. आम्हांला ठराव प्राप्त झाला तोच ग्राहय धरणार.

मा.सभापती साहेब :- वकीलाचे मत काय ? १५ दिवसाच्या मुदतीचा खुलासा काय आहे.

उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे साहेब :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

जकात अधिक्षक श्री. साबळे यांनाऑफिस रिपोर्ट वाचला.

मा.सभापती साहेब :- वकीलाने त्यांचे मत तातडीने मा.स्थायी समिती कडे पाठविण्यास सांगितले असता उशिर का झाला ?

उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे साहेब :- आयुक्त साहेब रजेवर होते.

जकात अधिक्षक श्री. साबळे :- आयुक्त साहेब रजेवर होते. मा.आयुक्त अधिकार डॉ. डोईफोडे यांचेकडे होते.

उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे साहेब :- वकीलाचे मत ६ डिसेंबर ला आले. ता. ८ व ९ डिसेंबर रोजी सुट्टी होती. फक्त ७ तारीख हा एकच दिवस गेला ता. १२ डिसें. रोजी प्रस्ताव पाठविला.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- मे. विपुलचा फायदा व्हावा असे धोरण यामागे दिसते.

मा.सौ. खरमाळे सं.र. व मा.श्री. डागवाले कि.आ. :- यामुळे आम्हची रोज बदनामी होती.

मा.सभापती साहेब:- यावेळेस २४ तासाचे का पत्र दिले नाही. मागचे वेळेस कसे काय दिले.

मा.सभापती साहेब :- वकीलांचे मत नवीन निविदा प्रक्रिया राबवावी प्रशासनाचा प्रस्ताव म्हणतो दयावा. याला जबाबदार कोण ?

उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे साहेब. :- प्रशासनानाने स्पष्ट मत दिले आहे.

मा.सभापती साहेब :- याला प्रशासन जबाबदार राहील.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- मंजुरीनंतर किती दिवसात करारनामा पुर्ण होईल.

जकात अधिक्षक्ष श्री. साबळे :- ७ दिवस लागेल.

मा.श्री. सातपुते दि.ना. :- तातडीने त्यांना दयावा. म्हणजे नुकसान घेणार नाही.

मा.सभापती साहेब :- कायदेशीर बाबीवर अडचणी आल्यास त्यांस प्रशासन जबाबदार राहील या अटीवर देवू.

मा.श्री. डागवाले कि.आ. : इतर अटी व शर्ती टाकाण्यात यावी. अभिकर्ता विरूध्द ३ वेळा तक्रारी आल्यास तो ठेका रद्द करण्यांत यावा.

मा.श्री. सातपुते दि.ना. :- जॉईंट व्हेंचर असू नये अशी अट टाकल्यामुळे भागीदारातील कंपन्याना या निविदा प्रक्रिये मध्ये सहभागी होता आले नाही. त्यामुळे मोठ मोठया कंपन्या स्पर्धोतून बाहेर राहील्याने मोठे आर्थिक नुकसान होवू शकते.

मा.श्री. शेख अरीफ शे. र. :- ही निविदा प्रक्रिया ही मा. शासन परिपत्रकानुसार नव्याने राबवुन ३० दिवसाची मुदत देणे गरजेचे होते. त्यामुळे स्पर्धा होवून महानगरपालिकेचे आर्थिक फायदा झाला असता.

मा.सौ. खरमाळे सं.र. :- भविष्यात या निविदा प्रक्रिया संदर्भात कायदेशीर अडचणी आल्यास त्यांस प्रशासन जबाबदार राहील.

मा.श्री.बोरूडे अ.व. :- या निविदेबाबत कायदेशीर अडचणी आल्यास त्यांस प्रशासन जबाबदार राहील. अशी अट टाकून मंजुरी दयावी.

मा.सभापती साहेब :- या निविदा प्रक्रियेत कायदेशीर अडचणी आल्यास त्यांस प्रशासन जबाबदार राहील. या अटीवर मे. मॅक्स लिंक यांना सर्वानुमते मंजुरी दयावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीत सन २०१२-२०१३ या वर्षाकरिता पारगमन शुल्क वसुलीकरिता अभिकर्ता नेमणूक प्रक्रिया बाबत अहमदनगर महानगरपालिकेचे मा.मुंबई उच्च न्यायालयाचे, औरंगाबाद खंडपीठ येथील विधी सल्लागार यांच्या अभिप्रायासह प्रशासकीय ऑफिस रिपोर्टावर सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

अहमदनगर महानगरपालिका हद्दीत सन २०१२-२०१३ या वर्षाकरिता पारगमन शुल्क वसुलीकरिता अभिकर्ता नियुक्ती करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व प्रशासकीय छाननी समितीने केलेल्या शिफारशीनुसार प्रशासकीय प्रस्ताव पहाता महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होवु नये याबाबतच्या प्रस्तावानुसार मे. मॅक्स लिंक , पुणे यांची जादा दराची निविदा रक्कम रूपये २१,०६,००,०००/-(रूपये एकवीस कोटी सहा लाख फक्त ) देकार रकमेस मंजुरी देण्यांत येत आहे.

तसेच भविष्य काळात या निविदे प्रक्रियाबाबत कायेदशीर अडचणी आल्यास त्यांस प्रशासन जबाबदार राहील.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ. खरमाळे संगीता रत्नाकर सही /-

अनुमोदक :- मा.श्री. बोरूडे अनिल वसंतराव सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-<br>
सभापती,<br>
स्थायी समिती<br>
अहमदनगर महानगरपालिका